



# पार्श्वभूमी






बीड वर्ष ३६ वे अंक १०७ वा फोन २३०१०१ दिनांक १७ मार्च २०२६ मंगळवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# महात्मा फुले जनआरोग्य योजनेत रुग्णालयांकडून लूट
# आरोग्य मंत्री म्हणाले, अशा रुग्णालयांवर कारवाई करु

बीड दि.१६ (प्रतिनिधी):– राज्यातील खाजगी रुग्णालयामध्ये रुग्णांकडून आकारल्या जाणाऱ्या अवाजवी शुल्काचा मुद्दा सोमवारी सभागृहात गाजला. महात्मा फुले जनआरोग्य योजना असलेल्या रुग्णालयांकडून रुग्णांची लूट केली जात आहे. योजनेत विविध शस्त्रक्रिया होत असतांना देखील जास्तीचे पैसे घेतले जातात. यावर बोलतांना आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे पॅकेज वाढवून दिले आहे. लूटमार करणाऱ्या रुग्णालयाची माहिती द्या, आम्ही कारवाई करु असा इशारा त्यांनी दिला.

विधानसभेत सोमवारी कॉंग्रेसचे नाना पटोले यांनी महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा मुद्दा उपस्थित करत महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि पंतप्रधान जनआरोग्य योजना यांचा एकत्रित लाभ रुग्णांना मिळण्यासाठी सरकार काय उपाययोजना करणार? असा प्रश्न उपस्थित पान २ वर

## रुग्णालया विषयी तक्रार आल्यास आम्ही कारवाई करु

यावेळी बोलतांना आ.सुनील प्रभू म्हणाले की, आरोग्य योजना असेल, योजना बसविली जाते आणि नातेवाईकांना अतिरिक्त पैसे मागितले जातात. तिथे बोर्ड लावा, तक्रार असेल तर कारवाई व्हायला पाहिजे, ऑपरेशनच्या वेळी रुग्णांची लूट केली जाते, नातेवाईकांना त्रास होतो, पैसे घेतले जातात. यावर बोलतांना प्रकाश आबिटकर म्हणाले की महात्मा फुले योजनेचे पॅकेज वाढवून दिले आहे. या योजनेत एक पैसा घेतला तर तात्काळ कारवाई आम्ही करतो. रुग्णालयांना पॅकेजेस वाढवून देण्यात आली आहेत, आम्ही कारवाई करुत. आमदारांनी आपल्या मतदार संघातही योजनेचा आढावा घ्यावा जर चूक असेल तर सांगा आम्ही कारवाई करतो असा इशारा त्यांनी दिला.




## खाजगी रुग्णालयांनी उपचाराचे दरपत्रक लावावे

या चर्चेत बोलतांना राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, शासनाच्या योजनेत उपचार होत असतांना रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना कुठलेही अतिरिक्त पैसे द्यायची गरज नाही. अशा परिस्थितीत रुग्णालय जर पैसे मागत असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच राज्यातील सर्व खाजगी रुग्णालयांनी उपचाराचे दरपत्रक सर्वांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावणे बंधनकारक आहे. मात्र उपचारासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कावर कोणतीही कमाल किंवा निश्चित मर्यादा नाही असे त्यांनी कबूल केले. या योजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी व्हावी यासाठी पालकमंत्री, लोकप्रतिनिधी आणि आमदार यांची समिती स्थापन करण्यात आलेली आहे. ही समिती आढावा घेते. प्रत्येक आमदारांनी आपल्या भागातही आढावा घ्यावा असे त्यांनी सांगितले.

# बीडमध्ये बदली आदेश धाब्यावर

## वर्षभरानंतरही गटविकास अधिकारी अमरावतीला रुजू नाहीत

### मुकुंद धुताडमल यांची मुख्यमंत्री यांना तक्रार

बीड दि.१६ (प्रतिनिधी):– पंचायत समिती वडवणी (जि. बीड) येथील गटविकास अधिकारी विठ्ठल मोहनराव नागरगोजे यांची अमरावती जिल्ह्यात बदली होऊनही ते अद्याप नवीन ठिकाणी रुजू झाले नसल्याच्या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते मुकुंद धुताडमल यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन तात्काळ चौकशी व कारवाईची मागणी केली आहे. शासनाने काढलेल्या बदली आदेशाला जवळपास एक वर्ष पूर्ण होत आले असतानाही संबंधित अधिकारी बदलीच्या ठिकाणी रुजू न झाल्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्यावर शिस्तभंगाची कठोर कारवाई करण्यात यावी अशी देखील मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने दि.३० मे २०२५ रोजी काढलेल्या आदेशानुसार पंचायत समिती वडवणी (जि. बीड) येथील गटविकास अधिकारी विठ्ठल मोहनराव नागरगोजे यांची पंचायत समिती अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथे बदली करण्यात आली होती. मात्र या आदेशाची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. शासन आदेशानुसार संबंधित अधिकाऱ्याने तात्काळ नवीन ठिकाणी पदभार स्वीकारणे अपेक्षित असताना तसे पान २ वर

### बदली आदेशाचा उघड अवमान

शासनाने काढलेल्या बदली आदेशाला जवळपास एक वर्ष होत आले आहे तरीही संबंधित गटविकास अधिकारी बदलीच्या ठिकाणी रुजू झालेले नाहीत. हा शासन आदेशाचा उघड अवमान असून या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित गटविकास अधिकारी तसेच त्या वेळचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तात्काळ निलंबित करावे.
– मुकुंद धुताडमल

## आता पेट्रोल पंपावर मिळणार केरोसिन


मुंबई दि.१६ (प्रतिनिधी):- राज्यात घरगुती गॅस अर्थात एलपीजी तुटवड्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर उतारा काढण्यासाठी आता राज्य सरकारकडून बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर केरोसिन आणण्याची योजना आखण्यात आली आहे. जेणेकरुन सामान्य नागरिकांना वेळेवर गॅस सिलेंडर न मिळाल्यास केरोसिनचा वापर करता येईल. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी यासंदर्भात विधिमंडळाच्या अधिवेशनात निवेदन मांडले. छगन भुजबळ यांनी राज्यातील गॅस टंचाईबाबत भाष्य करताना म्हटले की, मी बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयओसीएल या पेट्रोलियम कंपन्यांच्या प्रतिनिधींशी सकाळी चर्चा केली. त्यांनी राज्यातील घरगुती गॅसचे दैनंदिन उत्पादन ९ हजार वरुन ११ हजार मेट्रिक टनपर्यंत वाढवल्याचे सांगितले. तसेच पान २ वर

# पाटोद्यात स्टॅम्प तिकिटांचे वितरण सुरू

## आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्यानंतर प्रश्न मार्गी

पाटोदा दि.१६ (प्रतिनिधी):– पाटोदा शहरात मागील पाच ते सहा महिन्यांपासून निर्माण झालेल्या पाच व दहा रुपयांच्या न्यायालयीन शुल्क मुद्रांक तिकिटांच्या तुटवड्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून सोमवार (दि.१६ मार्च) पासून तिकिटांचे प्रत्यक्ष वितरण सुरू करण्यात आले आहे. आमदार सुरेश धस यांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने बीड येथून तातडीने तिकिटांचा साठा मागवून पाटोद्यात उपलब्ध करून दिला.





### : प्रतिक्रिया :

मागील अनेक महिन्यांपासून पाच व दहा रुपयांच्या न्यायालयीन तिकिटांच्या अभावामुळे न्यायालयीन कामकाज करताना मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. आमदार सुरेश धस यांनी या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन प्रशासनाला निर्देश दिल्यामुळे तिकिटांचा साठा उपलब्ध झाला आहे. याबद्दल पाटोदा वकील संघाच्या वतीने आम्ही त्यांचे आभार मानतो.
ॲड. सचिन जावळे, वकील, पाटोदा.

पाच व दहा रुपयांच्या तिकिटांचा दीर्घकाळ तुटवडा असल्याने न्यायालयीन कामकाजात मोठे अडथळे निर्माण झाले होते. आरोपींच्या हजेरीमाफीचे अर्ज, जामीन अर्ज, स्टेप्स अर्ज, प्रतिज्ञापत्रे तसेच विविध अर्जांकरिता या तिकिटांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याने वकील व पक्षकारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.
या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी पाटोदा पत्रकार संघाचे सचिव ड. महेश बेदरे यांनी आमदार सुरेश धस यांच्याकडे मागणी केली होती. तसेच वकील संघाच्या वतीने ॲड.जब्बार पठाण यांनीही उपकोषागार कार्यालयाकडे तातडीने तिकिटांचा साठा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर आमदार धस यांनी प्रकरणाची दखल घेत आपल्या पान २ वर



महाराष्ट्र राज्याचे मा.आरोग्य मंत्री, भूम– परंडा– वाशी मतदारसंघाचे आमदार, मराठा भूषण, प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांना वाढदिवसानिमित्त कात्रज पुणे येथील कार्यालयात शुभेच्छा देऊन आशीर्वाद घेताना अखिल भारतीय छावाचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन तसेच सोबत छावा मित्रपरिवार.

# वाळू तस्कर हनुमंत काशीद याच्याविरुद्ध एमपीडीए

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- जिल्हयातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्यापासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. त्याच अनुषंगाने शिरूर तालुक्यातील फुलसांगवी येथील हनुमंत रामभाऊ काशीद याच्याविरुद्ध एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.



बीड जिल्हयातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून एमपीडीए कायद्याअंतर्गत अनेक गुन्हेगारांवर व गुंडावर कारवाई करण्यात येत आहे. यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभत आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या सुचनेवरुन स.पो.नि. प्रविण जाधव पोलीस ठाणे शिरुर कासार यांनी दि. २ मार्च २०२६ रोजी हनुमंत रामभाऊ काशीद (वय-५० वर्षे रा. फुलसांगवी ता. शिरुर जि. बीड) याच्या विरुध्द एमपीडीए कायद्या अंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी बीड यांना सादर केला होता. सदर स्थानबध्द इसमा पान २ वर

## राज्यातील हजारो करदात्यांना उच्च न्यायालयाचा मोठा दिलासा

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी):- जुन्या थकबाकीसाठी सेटलमेंट योजनेचा लाभ घेतलेल्या राज्यातील हजारो करदात्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. एखाद्या करदात्याने म्नेस्टी स्कीम अंतर्गत थकबाकीचा निपटारा करण्यासाठी अर्ज केला असल्यास सरकार पान २ वर

# सरकारकडून पुन्हा कोरोनासारखी परिस्थिती

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी):- मध्य-पूर्वेतील युद्धजन्य स्थितीमुळे जगभरात तणावाचे वातावरण आहे. अमेरिका-इस्त्रायलने इराणविरोधात युद्ध पुकारले आहे. यामुळे इराणच्या सामुद्रधुनी मार्गे येणारे इंधन आणि गॅसचा पुरवठा ठप्प झाला आहे. याचे पडसाद आता भारतात उमटत आहे. सामान्य नागरिकाच्या घरातील एलपीजी गॅस संपला आहे. व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत. पान २ वर






## हॉटेल गोल्डन चॉईसच्या मालकासह पुत्रांवर गुन्हा दाखल

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- माझ्या वॉचमनला गाडी काढायला का सांगितले? या कारणावरुन हॉटेल गोल्डन चॉईसचे मालक बप्पासाहेब घुगे यांनी मारहाण केली अशी तक्रार सुधीर सर्जेराव हजारे यांनी दिल्यावरुन बीड शहर पोलीस ठाण्यात घुगे यांच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात सुधीर सर्जेराव हजारे यांनी दि.१६ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, बप्पासाहेब घुगे यांनी माझ्या वॉचमनला गाडी काढायला का सांगितले म्हणून मला बप्पासाहेब घुगे, संजय बप्पासाहेब घुगे, अजय घुगे यांनी शिवीगाळ करुन चापटाने मारहाण केली, जीवे मारण्याची धमकी दिली म्हणून या तिघांविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ११५ (२), ३५१(२), ३५२,३(५) नुसार अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
या हॉटेलच्या पाठिमागे असणाऱ्या कॉलनीतील लोकांच्या हॉटेल मालकाविरुद्ध नेहमीच तक्रार आहेत. हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांच्या गाड्या रस्त्यावर लावल्याने अडथळा निर्माण होत आहे. यामुळे या भागातील रहिवाशी कंटाळले आहेत.

# गाव बदलले तरी कुठूनही घेता येणार रेशन

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी):- रेशन कार्डधारकांसाठी राज्य सरकारने एक अत्यंत दिलासादायक निर्णय घेतला आहे. 'वन नेशन वन रेशन कार्ड' योजनेला अधिक प्रभावी करण्यासाठी १ एप्रिलपासून रेशन दुकानदारांवरील धान्यांच्या कोट्याचे निर्बंध पूर्णपणे हटवण्यात येणार आहेत. यामुळे स्थलांतरित नागरिकांना आता कोणत्याही दुकानातून हक्काचे धान्य मिळणे सोपे होणार आहे.

**स्थलांतरित नागरिकांसाठी राज्य सरकारचा दिलासादायक निर्णय**

यापूर्वी रोजगारासाठी बाहेरगावी गेलेल्या लाभार्थ्यांना रेशन घेण्यासाठी रोजगार बुडवून गावात परत यावे लागत होते. अन्यथा महिना संपताच रेशन मिळत नसे. आता मात्र कुठूनही धान्य मिळणार आहे. आतापर्यंत प्रत्येक रेशन पान २ वर




# धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर लोहमार्गाने बीड जिल्हा उत्तर भारत-दक्षीण भारताशी जोडला जाणार

## खा.डॉ.भागवत कराड यांची स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समितीला माहिती

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील सर्वात जुना अहिल्यानगर- बीड- परळी वैद्यनाथ लोहमार्ग आहे. याचे काम अलिकडच्या काळामध्ये जलद गतीने होत आहे. बीड जिल्ह्याला यासह धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर या नवीन लोहमार्गाने जोडले जाणार आहे. यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. धाराशिव - छत्रपती संभाजीनगर लोहमार्गाने बीड जिल्हा उत्तर भारत आणि दक्षिण भारताशी जोडला जाऊन बीड जिल्ह्याचे ठिकाण लोहमार्गाचे जंक्शन होईल अशा दृष्टीने बीड जिल्ह्याचा विकास होणार असल्याची माहिती खा.डॉ.भागवत कराड यांनी दिली.

खा. डॉ. भागवत कराड हे रविवारी (दि.१५) बीड मार्गे छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर होते. रात्री उशीरा त्यांनी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समिती, बीड च्या शिष्टमंडळास बीड येथील हॉटेल सनराईज येथे भेटण्याची वेळ दिली. यावेळी समितीच्या शिष्टमंडळास चर्चा करताना डॉ. खा. कराड यांनी माहिती दिली.

यावेळी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे आंदोलन समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा, सचिव सुनील क्षीरसागर, ज्येष्ठ मार्गदर्शक सत्यनारायण लाहोटी, सुरेश मेखे, भास्करराव जाधव, अशोक शेटे, शांतीलाल पटेल, वाय. जनार्दन राव, विष्णुदास बियाणी, शिवाजी जाधव, मनमोहन कलंत्री, विलासराव बडगे, अरुण डाके, सुरेश बुध्ददेव, डॉ. अरुण भस्मे, अप्पासाहेब शिंदे, राजेंद्र बंब, प्रा. मन्मथ हेरकर, महंमद लईक, रामचंद्र जोशी, तुकाराम सोळंके, रवी उबाळे, हमीद देशमुख, वैभव स्वामी, गोविंद काकट, भाऊसाहेब चंदनशीव, मंगेश लोळगे, सय्यद नवीदुज्जमा, सोमनाथ खताळ आदी उपस्थित होते.

डॉ. खा. कराड, म्हणाले, धाराशिव ते छत्रपती संभाजीनगर बीड मार्गे जोडल्या जाणाऱ्या लोहमागार्साठी मी व्यक्तीहा राज्यसभेमध्ये मागणी मांडली आहे. या लोहमार्गाचा अनेक जिल्ह्यांना आणि विषेशतः बीड जिल्ह्यामार्गे उत्तर भारत आणि दक्षीण भारत जोडून मराठवाड्याच्या विकासाचे नवे दालने खुले होईल, असे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्याचबरोबर रेल्वे मंत्री यांनी देखील तत्वता: संमती दिलेली आहे, अशी माहिती खा.डॉ. कराड यांनी बीड येथे चर्चा करताना दिली.

दक्षीण भारत - उत्तर भारतास जोडला जाणार

धाराशिव- संभाजीनगर या नवीन रेल्वे मार्गासाठी ७ ते ८ कोटी ठेवले आहेत. सर्व्हे करुन घेणार, त्याचा डिपीआर तयार होईल त्यास देखील पाठपुठपुरावा करुन मंजुरी करुन घेतली जाईल, तीच रेल्वे पुढे कन्नडमार्गे धुळ्यास जोडणार म्हणजे दक्षीण भारत -उत्तर भारतास जोडला जाणार आहे, असेही खा. डॉ. भागवत कराड यांनी सांगितले.

सोलापूर- धुळे लोहमार्ग बीडच्यापुढे असा असेल

बीड, गेवराई, पैठण, बीडकिन, शेंद्रा- छत्रपती संभाजीनगर, दौलताबाद - वेरुळ, कन्नड, चाळीसगाव नंतर धुळे असा हा लोहमार्ग असणार आहे. दुसरा नवीन लोहमार्ग असेल छत्रपती संभाजीनगर - गंगापूर- शनीशिंगनापूर- अहिल्यानगर- पुणे असा नवीन लोहमार्ग असणार आहे. त्यामुळे लोहमार्गचे जाळे छत्रपती संभाजीनगरच्या भोवती विकासासाठी जोडले जाणार असल्याचेही खा.डॉ. कराड यांनी सांगितले.

पान १ वरून

## महात्मा फुले जनआरोग्य योजनेत लूट

केला. तसेच या योजने अंतर्गत रुग्णांना उपचार मिळत असतांनाही काही रुग्णालयांकडून अतिरिक्त पैसे घेत असल्याच्या तक्रारी घेत असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. यावर उत्तर देतांना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, अशा रुग्णालयांवर आम्ही कारवाई करतोय. जिल्हा पालकमंत्री, लोकप्रतिनिधी आणि आमदार यांच्या समावेशाने एक समिती स्थापन करण्यात आली असून दर तीन महिन्यांनी आढावा घेतला जातो. कुठेही गैरप्रकार आढळल्यास सरकार कारवाई करण्यास पुढेमागे पाहणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

आ.बबनराव लोणीकर यांनी आयुष्यमान योजनेच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित करतांना सांगितले की, आयुष्यमान भारत योजना आणली, बायपास करायचे असेल तर ६ लाख रुपये लागतात, मात्र केवळ १ लाख रुपये दिले जात आहेत. केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रत्येकी ३ लाख रुपये येतात. यावर बोलतांना आरोग्यमंत्री म्हणाले की, कोणतेही पैसे द्यायचे नसतात, आपण प्रभावीपणे जनआरोग्य योजना राबवितो. महात्मा फुले योजना ही पांढऱ्या रेशन कार्ड असणाऱ्यांना देखील आहे. अशा सर्वांनी योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

## पाटोद्यात स्टॅम्प तिकिटांचे वितरण सुरु

कार्यालयामार्फत उपकोषागार विभागाला पत्र देत तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या.

यानंतर प्रशासनाने बीड येथून तिकिटांचा साठा मागवून पाटोद्यात उपलब्ध करून दिला असून सोमवारपासून त्यांचे वितरण सुरू झाले आहे. त्यामुळे न्यायालयीन कामकाजात निर्माण झालेला अडथळा दूर झाला असून वकील व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## बीडमध्ये बदली आदेश धाब्यावर...

झाले नसल्याचे समोर आले आहे.

याशिवाय पंचायत समिती वडवणी येथून संबंधित गटविकास अधिकाऱ्याला अद्याप कार्यमुक्त करण्यात आले नसल्याची माहितीही पुढे आली आहे. त्यामुळे शासन आदेशाची अंमलबजावणी का झाली नाही, याबाबत प्रशासनात आश्चर्य व्यक्त होत आहे.

दरम्यान, त्या काळातील जिल्हा परिषद बीडचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांनी शासन आदेशानुसार संबंधित अधिकाऱ्यास तात्काळ कार्यमुक्त करणे अपेक्षित असताना तसे झाले नसल्यामुळे या प्रकरणात संगनमत असल्याचा आरोपही होत आहे. स्थानिक स्तरावर या प्रकरणात आर्थिक व्यवहार झाल्याची चर्चा देखील सुरू असून त्यामुळेच बदली आदेशाची अंमलबजावणी करण्यात विलंब झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित गटविकास अधिकारी तसेच जबाबदार अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. शासनाच्या बदली आदेशाची अंमलबजावणी न होणे ही गंभीर बाब असून प्रशासनातील शिस्त व पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचेही बोलले जात आहे.

## कुठूनही घेता येणार रेशन...

दुकानदाराला केवळ त्याच्याकडे नोंदणीकृत असलेल्या कार्डधारकांच्या संख्येनुसारच धान्य साठा मिळत होता; मात्र १ एप्रिलपासून हे निर्बंध शिथिल होतील, महिन्यानंतर शिल्लक धान्यसाठा बघून रेशन दुकानदाराला पुढील महिन्याचे धान्य मागणी करावी लागणार आहे. वीट कामगार, मजूर, शेतमजूर, नोकरीनिमित्त स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांसाठी हा निर्णय वरदान ठरणार आहे.

कोणत्याही दुकानातून धान्य घेता येणार

केंद्र सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे कोणत्याही राज्यातील किंवा जिल्ह्यातील नागरिक त्याच्या आधार लिंक असलेल्या रेशन कार्डाद्वारे कुठल्याही स्वस्त धान्य दुकानातून धान्य घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचा फार मोठा दिलासा स्थलांतरित कामगारांना मिळाला आहे.

आता राज्यात 'वन नेशन वन रेशन' योजना

केंद्र सरकारने देशातील प्रत्येक पात्र व्यक्तीला कुठूनही रेशन घेता यावे, यासाठी 'वन नेशन वन रेशन' ही योजना सुरू केली. भारतातील कोणत्याही राज्यातून आता रेशन घेता येणार आहे

रेशन पोर्टेबिलिटीसाठी काय करायचे ?

रेशन कार्ड आधार कार्डशी लिंक असणे अनिवार्य आहे. कुटुंबातील कोणत्याही सदस्याने दुकानात जाऊन ई-पॉस मशीनवर अंगठा लावणे आवश्यक आहे. अंगठा जुळल्यास तत्काळ धान्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

## वाळू तस्कर काशीद विरुद्ध एमपीडीए...

विरुध्द पोलीस ठाणे शिरूर, चकलंबा येथे अवध गौन खनीजची चोरटी वाहातु करणे व साठे करणे, जुगार प्रतिबंधत्मक अधीनियमाप्रमाणे गुन्हे दाखल आहेत, सदर इसमा विरुध्द प्रतिबंधत्मक कार्यवाही करुन सुध्दा तो केलेल्या प्रतिबंध कार्यवाहीस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गुन्हे करण्याची श्रृंखला चालूच ठेवुन होता, त्याची शिरुर व परीसरात प्रचंड दहशत आहे. त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्यास अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. तो सर्वसामान्य लोकांना त्रास देवून दहशत निर्माण करुन, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा पोहचवत होता. सदर प्रकरणांत जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिनांक १६ मार्च २०२६ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हसुल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यावरुन पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना शिरुर पोलीस व स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. त्यानुसार १६ मार्च २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी हनुमंत काशिद यास ताब्यात घेऊन पपुढील कार्यवाहीसाठी शिरूर कासार पोलिसांच्या यांच्या ताब्यात दिले होते. शिरूर पोलिसांनी यांनी नमुद इसमास ताब्यात घेऊन हार्सल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबध्द केले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, आष्टीचे उप अधीक्षक हानपुडे पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. प्रविण जाधव, पोउपनि धनजंय कुलकर्णी, पोह. अनिल तांदळे, पोशि. सतिष बहिरवाळ तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, पोह.विकास राठोड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर तसेच मटका, लॉटरी जुगार खेळाणाऱ्या व खेळविणाऱ्या जास्तीत जास्त एमपीडीए कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिले आहेत.

## राज्यातील हजारो करदात्यांना दिलासा...

त्यांचा जुना टॅक्स रिफंड नवीन मागणीविरुद्ध परस्पर वळता करू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला.

प्रेसिडेंट ट्रेड अँड एक्झिम कॉर्पोरेशन नावाच्या कँपनीने दाखल केलेल्या याचिकेवर न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. आरती साठे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. कँपनीचा २००७-०८ या वर्षाचा ३३.२९ लाख रुपयांचा रिफंड सरकारकडे प्रलंबित होता. याचदरम्यानच्या काळात सरकारने प्रलंबित कर विवादांसाठी महाराष्ट्र थकबाकी तडजोड योजना २०२३ जाहीर केली. त्या योजनेंत याचिकाकर्त्या कँपनीने २००८-०९ आणि २००९-१० या वर्षांतील थकबाकीचा निपटारा करण्यासाठी अर्ज केला आणि नियमानुसार २० टक्क्यांची रक्कम भरली.

## आता पेट्रोल पंपावर मिळणार केरोसिन...

एलपीजी उत्पादनातील सगळ्या अडचणी दूर करण्याचे काम सुरु असल्याचे या कँपन्यांकडून सांगण्यात आले.

सध्याच्या गॅस टंचाईतून मार्ग काढण्यासाठी घरगुती गॅसच्या उत्पादनाला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे. यानंतर गॅस उरलाच तर रुग्णालये, शैक्षणिक संस्था, वृद्धाश्रम, स्मशानभूमी यांना एलपीजी उत्पादनात १०० टक्के प्राधान्य दिले जाईल. औषध उद्योगासाठी आणि संरक्षण क्षेत्रातील उपहारगृहांना एलपीजी वितरणात ५० टक्के प्राधान्य आहे, असेही छगन भुजबळ यांनी सांगितले. यावेळी छगन भुजबळ यांनी केरोसिनच्या वापराबाबत भाष्य केले. त्यांनी म्हटले की, आपल्याकडे राज्यात केरोसिनचा भरपूर साठा आहे. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना केरोसिन द्यायची गरज नाही, असे निर्देश मध्यंतरी न्यायालयाने दिले होते. मात्र, आता आम्ही सगळ्यांना केरोसिन उपलब्ध करण्यासंदर्भात न्यायालयाला कळवले आहे. त्यानुसार केरोसिन डिलर्सही केरोसिन देऊ शकतात.

मात्र, मध्यंतरी आपण केरोसिन पूर्णपणे बंद केल्याने केरोसिन डिलर्सची साखळी तुटली होती. त्यामुळे बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयओसीएल या कँपन्यांच्या पंपांवर केरोसिन उपलब्ध करुन देऊ. जेणेकरुन केरोसिनमध्ये भेसळ होणार नाही. आम्ही केंद्र सरकारच्या सातत्याने संपर्कात आहोत. एलपीजी आणि पेट्रोलियम पदार्थ मिळवण्यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. हा प्रश्न हळूहळू सुटेल, असेही छगन भुजबळ यांनी सांगितले.


# पाहिजेत

मराठवाडयातील नामांकित असलेले भारत सरकार मान्यता प्राप्त

## वाहन फिटनेस तपासणी

(Automation Testing Centre)

बीड, छ.संभाजीनगर, नांदेड व पुणे या सेंटर करीता खालीलप्रमाणे मनुष्यबळाची आवश्यकता आहे. पात्र उमेदवारांनी आपल्या अर्जासह संपर्क करावा.

| अनु | पद | शैक्षणीक पात्रता | पद संख्या |
|---|---|---|---|
| १. | केंद्र प्रमुख/ व्यवस्थापक | डिप्लोमा (अॅटोमोबाईल / इलेक्ट्रीकल मेकॅनिकल /इलेक्टॉनिक्स) २. किमान ५ वर्षाचा अनुभव त्यापैकी २ वर्षाचा वाहन तपासणीचा अनुभव. ३. वाहन शोरुम मधील उमेदवारास प्राधान्य. | ०२ |
| २. | लेन/ऑपरेटर | १. डिप्लोमा (मोटार मॅकेनिक/मॅकनिकल अॅटोमोबाईल /इलेक्ट्रीकल). २. वाहन दुरुस्तीमध्ये ३ वर्षाचा अनुभव. ३. वाहन चालविण्याचा अनुभव आवश्यक. | ०६ |
| ३. | मेंटेनस टेक्निशियन | १. डिप्लोमा (A.C./ITI इलेक्ट्रिशियन / मॅकनिकल). २. इलेक्ट्रिकल मेंटेनस (maintainance) मध्ये २ वर्षाचा अनुभव. | ०२ |
| ४. | कॅशीअर कम अकाऊटंट | बँकेचे ज्ञान व टॅली येणे आवश्यक. | ०३ |
| ५. | वाहन चालक ड्रायव्हर | मोटर लायसन्स, सोबत किमान ५ वर्षाचा वाहन चालविण्याचा अनुभव आवश्यक. | ०४ |

पात्र उमेदवारांनी आपल्या अर्जासह खालील नमुद ठिकाणी संपर्क करावा.

**JSG ड्रायव्हिंग ट्रेनिंग सेंटर,**

आर.टी.ओ. ऑफिस, नगर रोड, बीड.

Email- jaishriramgvsanstha@gmail.com

WhatsApps No 7073257325


## सरकारकडून पुन्हा कोरोनासारखी परिस्थिती

राज्यात आणि देशात एलपीजी गॅसची काय परिस्थिती आहे, हे सरकारने सर्वपक्षीय बैठक घेऊन स्पष्ट करण्याची मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी विधिमंडळ परिसरात माध्यमांसोबत बोलताना केली.

सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे राज्यातील एलपीजी टंचाईवर सर्व पक्षीय नेत्यांच्या बैठकीची मागणी केली असल्याचे सांगितले. ते म्हणाले, राज्यात आणि देशात गॅस टंचाई आहे. सरकारकडे इंधन आणि गॅस बाबतचे काय धोरण आहे, याची माहिती विरोधी पक्षाला मिळत नाही. सामान्य जनता तर यापासून दूरच आहे. राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांनी अशा कठीण परिस्थितीत सर्वपक्षीय नेत्यांची बैठक बोलावली पाहिजे. सर्वपक्षीय बैठक बोलावून या संकटावर कशी मात करता येईल हे मांडलं पाहिजे. मात्र या सरकारच्या काळात कोरोना आपत्तीमध्ये जी परिस्थिती होती आताही तसेच ते वागत आहे, असा आरोप नाना पटोले यांनी केला.

## पद्मश्री सिंधुताई सपकाळ 'सेवारत्न पुरस्काराने' श्रीम.सुषमा सोमवंशी यांचा गौरव

बीड दि.१६ (प्रतिनिधी):- स्त्री शक्ती प्रतिष्ठान,बीड आणि पसायदान सेवा प्रकल्प,ढेकणमोहा यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त पद्मश्री सिंधुताई सपकाळ 'सेवारत्न पुरस्कार २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय शिदोड येथे कार्यरत असलेल्या श्रीम.सुषमा विवेक सोमवंशी (फाटे) यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन त्यांना 'सेवारत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. मिळालेल्या पुरस्कारांबद्दल त्यांचे सहकारी वर्ग, नातेवाईक, परीवार यांच्या वतीने अभिनंदन होत आहे.

कार्यक्रमाचे आयोजन शक्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीम.जयश्री विधाते व पसायदान सेवा प्रकल्प ढेकणमोह अध्यक्षा सौ.रंजना दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ज्योतीताई विनायककरावजी मेटे या होत्या, तर उद्घाटक म्हणून सौ. सत्यभामाताई बांगर उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमत. प्रेमलताताई पारवे (नगराध्यक्ष, न.प. बीड), प्रा. संगिताताई शिंदे (जिल्हाध्यक्ष, जिजाऊ ब्रिगेड), सौ. वंदनाताई जगताप (नगराध्यक्ष, न.प. वडवणी), सौ. मंजुताई गाडीवान (सरपंच, ठेकणमोह) तसेच सौ. शोभाताई दत्तात्रय घुमरे आणि सौ. प्रियंका तांबेवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. आज समाजामध्ये सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच समाजसेवा, इ. विविध क्षेत्रात महीला उल्लेखनीय कार्य व योगदान देत आहेत. समाजघडणीत महिलांची भूमिका महत्त्वाची असते.महिलांच्या कार्याला प्रोत्साहन देणे हा या पुरस्कार सोहळ्याचा मुख्य उद्देश आहे .



शैक्षणिक कार्यात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल श्रीम. सुषमा विवेक सोमवंशी (फाटे) यांना यावर्षीचा पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ (माई) सेवारत्न पुरस्कार २०२६ मान्यवरांच्या हस्ते फेटा ,शाल , मानचिन्ह देऊन प्रदान करण्यात आला.हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि.१४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता पसायदान सेवा प्रकल्प, ठेकणमोह, ता. जि. बीड येथे आयोजित करण्यात आला होता. पुरस्कार मिळाल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी कौतुक व्यक्त करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम प्रसंगी मोठ्या संख्येने महीलांची उपस्थिती होती मोठ्या उत्साहात स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

पान ६ वरून

## पोलीस पाटील भरतीत निकालानंतर

आनंद साजरा होत असतानाच दुसऱ्याच दिवशी आक्षेप अर्जांची संख्या वाढू लागली. सोमवारी दुपारपर्यंत प्रशासनाकडे ४० पेक्षा अधिक आक्षेप अर्ज दाखल झाल्याची माहिती समोर आली. पात्र ठरलेल्या काही उमेदवारांवर संबंधित महसूल गावाचे स्थानिक रहिवासी नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आक्षेपांची सखोल पडताळणी करण्याचे आव्हान आता प्रशासनासमोर उभे ठाकले आहे. महसूल गावाच्या हद्दीत संबंधित उमेदवाराचा वास्तव नसल्याचे आढळल्यास त्याची निवड थेट रद्द होण्याची शक्यता असल्याने निवड झालेल्या उमेदवारांमध्येही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## समान गुण मिळालेल्या उमेदवारांची १८ मार्चला पडताळणी

या भरती प्रक्रियेत सात उमेदवारांना समसमान गुण मिळाले आहेत. त्यामुळे अंतिम निवडीबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाच्या २२ ऑगस्ट २०१४ च्या अध्यादेशानुसार १८ मार्च रोजी या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी केली जाणार आहे. यामध्ये पोलीस पाटील वारसदार, शैक्षणिक पात्रता, माजी सैनिक तसेच वय ज्येष्ठता या निकषांच्या आधारे अंतिम निवड करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## टायर फुटल्याने धावटी ट्रॅव्हल पलटून २० प्रवासी जखमी

येणाऱ्या बसमधून पुढे पाठविण्यात आले. दरम्यान अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली रात्रीच्या गस्तीवर असलेले पोलीस उप निरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, शंभुदेव दराडे व त्यांच्या पथकाणे प्रशांत नेहरकर, सुमित तेलंग सह ६ रुग्णवाहिकांना बोलावून २० जखमीना केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथून ११ जखमीना स्वाराती रुग्णालय, अंबाजोगाई येथे तर ९ जखमीना लातुर येथील खारुग्णायात पाठविण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ आवेज शेख यांनी बोलताना दिली .तर या घटनेतऋषिकेश बिभीषण पालवे २८,नांदूर, प्रशान्त शिवाजी गायकवाड २८,विशाल शिवाजी गायकवाड २० रा लामजाना जि लातुर, उमेर शेरेख शेख ३ महिन्याचे बाळ, रा अंबाजोगाई, राजकुमार दिनेश पाटील १९,रोहित गणेश पाटील ३०, सुधीर दिनेश पाटील, ४० रा जबलपूर, मनीष त्रिंबक तायडे ४,भुसावळ, गणेश बालाजी शिंदे ४० निलंगा, चंद्रकांत ब्रिजलाल राऊत, ४०,संस्कार चंद्रकांत राऊत ११,रा रावेर जळगाव, व लातुर येथील मयूर युवराज साळुंखे ३८,प्रथमेश राजकुमार कोकरे २०,सय्यद अब्दुल रहेमान २०,सय्यद रहेमान ५०,मधुकर भगवान क्षीरसागर ६०, सय्यद वाहेद ५०,मुकेश कोंडीराम जोशी २५,अविनाश गोविंद पिल्ले २०, या २० जणांचा जखमीत समावेश आहे. तरज्या ठिकाणी ट्रॅव्हल्स पलटी होऊन तीला आग लागली, या आगीत सारणी येथील शेतकरी राजाभाऊ भुजंग घोळवे या शेतकऱ्याचे अंबा, जांभूळ, चिंच, बोर आणि लिंब आसे पाच झाडे जळून गेल्यामुळे, ही माहिती देताना शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी आले होते.

## शिक्षकाची गळफास घेऊन आत्महत्या

की ज्या लोकांनी माझ्या पतीला आत्महत्या करण्यास भाग पाडले आहे या लोकांवर गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी अशी मागणी कैलास उघडे सर यांचे कुटुंब करत आहे.या संदर्भात कुठलाही गुन्हा दाखल झाला नसून पुढील तपास तलवाडा पोलीस करत आहेत.

## माजी आ.आजबे यांच्या वतीने आष्टीत इफ्तार पार्टी संपन्न

सर्वधर्मसमभाव, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला.आष्टी-पाटोदा-शिरूरमतदारसंघात हिंदू मुस्लिम ऐक्य व बंधू भावाचा संदेश देण्यासाठी माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्यावतीने इफ्तार पार्टीचे दरवर्षी आयोजन करण्यात येते या पार्टीसाठी सर्व धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहतात व मोठ्या उत्साहामध्ये एकत्र येत इफ्तार पार्टीचा आनंद घेतात.रमजान महिन्यात मुस्लिम बांधव दिवसभर कडक उपवास (रोजा) पाळतात आणि सूर्यास्ताच्या वेळी रोजा सोडण्याच्या प्रक्रियेला 'इफ्तार' असे म्हटले जाते. या इफ्तारच्या निमित्ताने विविध धर्म व समाजातील नागरिक एकत्र येऊन स्नेहभोजन करतात. त्यामुळे समाजात बंधुभाव, सलोखा आणि एकोपा वाढीस लागतो.या प्रसंगी आष्टी शहरासह पंचक्रोशीतील विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय नेते, डॉक्टर वकील समाजसेवक, व्यापारी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अभिमानाचा आणि भावनिक क्षण

गुवाहाटी (आसाम) येथे दि. १४ मार्च रोजी आयोजित जिसीओआय च्या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. ढगे यांना हा सन्मान मिळाला आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. उगो कोवणी, इटली यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. बीड जिल्ह्यातील डॉक्टराला पहिल्यांदाच असा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाल्याने ही घटना जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि प्रेरणादायी आहे. ग्रामीण भागातून सुरू झालेला हा प्रवास जागतिक व्यासपीठापर्यंत पोहोचला आहे. अनेक तरुण डॉक्टरांसाठीही ही मोठी प्रेरणा मानली जात आहे. दंतरोपण (Dental Implantology) क्षेत्रातील सातत्यपूर्ण अभ्यास, कौशल्य आणि रुग्णांप्रती असलेली संवेदनशीलता याची दखल घेत त्यांना ही फेलोशिप प्रदान करण्यात आली. मागील १७ वर्षापासुन कृत्रिम दंत रोपण (Dental Implant) करून बीडवासीयांची सेवा दिलेली आहे. डेंटल इंप्लांट केलेल्या रुग्णांची केस स्टडी रिपोर्ट व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या डॉक्टरांना ही जागतिक दर्जाची फेलोशीप देण्यात येते .या निमित्ताने भावना व्यक्त करताना डॉ प्रविण ढगे म्हणाले, ' मिळालेला हा सन्मान माझ्या एकट्याचा नाही. माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या रुग्णांचा, मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा , आई वडिलांचा आणि प्रत्येक टप्प्यावर साथ देणाऱ्या सुविद्य पत्नी डॉ शितल ढगे , डॉ रोहिणी व डॉ किरण सवासे व मित्रांचा आहे. त्यांच्या पाठिंब्यामुळेच हा प्रवास शक्य झाला'. सदर फेलोशिप मिळाल्याबद्दल बीड जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्र, मित्रपरिवार आणि रुग्णांकडून डॉ. प्रवीण ढगे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिल्ह्यासाठी हा एक अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण ठरला आहे.

## ट्रॅक्टरची चावी का देत नाहीस ? असे म्हणुन पोटच्या मुलाने पित्याला केले रक्तबंबाळ

नरसिंग बिक्कड,व महादेव चिंतामण बिक्कड या दहा जना विरुद्ध लोखंडी रॉडणे, काठीने, दांड्याने, लाथा, बुक्क्याने व मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली म्हणुन केज पोलिसात गून्हा नोंद झाला आहे. जखमीवर अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात उपचार सुरु आहेत.पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उपनिरीक्षक अशोक सोनवणे हे पुढील तपास करीत आहेत.पुत्र येड्यावरच थांबला नाही तर जन्मदात्या पित्याला रागाच्या भरात, त्यांचे हातपाय बांधून, जीपमध्ये टाकून तलावात टाकण्यासाठी जीप तिकडे घेवून गेले आसता, कांही कारणास्तव तेथून परत त्यांच्या घरी आणुन सोडण्यात आल्याची नोंद फिर्यादित करण्यात आली आसून या प्रकारामुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

## ॲड.विलास सोनवळकर यांचे निधन

दु:खद निधन झाले. विलास सोनवळकर हे अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी होते. गेल्या ४० वर्षापासून ते छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयात वकिली करत होते. श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ विधीज्ञ सुरेश सोनवळकर यांचे ते लहान बंधू होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन अविवाहित मुली असा परिवार आहे.१४ मार्च शनिवार रोजी त्यांच्या पार्थिवावर छत्रपती संभाजीनगर येथील प्रताप नगर स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.या प्रसंगी त्यांचे नातेवाईक आणि मित्रपरिवार उपस्थित होते.

## वीज पुरवठा बंद तरीही बील ; महावितरणने चालवला वीज ग्राहकाचा मानसिक छळ

काढून पेमेंट ऑनलाईन पद्धतीने अदा केलेले आहे. माझ्याकडे कोणतीही थकबाकी नसताना व कोणतीही पूर्वसूचना न देता यापूर्वीच अचानक वीज पुरवठा खंडित केला आहे. वीज कनेक्शन बंद असताना ही वीज वापराचे बिल मिळत आहे हा प्रकार अजबच म्हणावा लागेल अशी तक्रार व महावितरणच्या कारभाराविषयी परदेशी यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. अवास्तव व भरमसाठ बिल पाहून परदेशी यांना काही दिवसांपूर्वी मोठा मानसिक धक्का बसला आहे. न वापरलेल्या वीजेच्या वाढीव बिलामुळे ते तणावाखाली आहेत. यामुळे आपल्या जीवाचे काही बरेवाईट झाल्यास याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल ही परदेशी यांनी लेखी स्वरूपातील अर्जाद्वारे महावितरणला केला आहे. आम्ही नियमीत वीज बिल भरणा करीत असून व कधीही वीज बिल थकीत ठेवलेले नसताना आम्हांला इतक्या मोठ्या रकमेचे बिल देऊन, मानसिक त्रास तर दिला आहे. त्यामुळे आता आपण महावितरणच्या या भोंगळ, मनमानी कारभाराविरोधात नाराजीने सक्षम प्राधिकरणाकडे रितसर तक्रार दाखल करून न्यायालयातही दाद मागणार असल्याचे समाजवादी पार्टीचे शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

## सरकारी पगार वेळेवर पण काम मात्र मनावर

काटेकोर पालन करत प्रशासनात शिस्त राखण्याचा प्रयत्न करत असताना त्यांच्या अधिनस्त असलेल्या नगरपरिषदेमध्ये मात्र प्रशासनाचा कारभार नियोजनशून्य पद्धतीने सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडी, बीड जिल्हा (पश्चिम) यांच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देऊन नगरपरिषद कार्यालयास अचानक भेट देऊन प्रत्यक्ष तपासणी करावी व कार्यालयीन वेळेत अनुपस्थित आढळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## अमरजीत राम बाहेती यांना संगीत विषयातील पीएचडी प्रदान

संगीत विभाग प्रमुख डॉ.वैशाली संतोष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले आहे. या यशाबद्दल अमरजीत यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे. सुनंदा गोरे, सुजाता कानगो, रेखा आवरगांवकर, डॉ.भारती गवळी, डॉ.रजनी शिखरे, डॉ.निलिमा पांडे, डॉ.सुधाकर शेंडगे, डॉ.कैलास अंभुरे आदींनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. अमरजीत बाहेती या संगीतामध्ये विशारद असून डॉ.वैशाली देशमुख, प्रा.पं.विजय देशमुख, प्रा.आनंद पाटील, पं.राम विधाते व बजरंग विधाते, आशालता भंडारे हे त्यांचे संगीतातील गुरू आहेत. अमरजीत बाहेती यांची ओळख शाहीर अशीही असून डॉ.प्रभाकर मांडे यांच्याकडून त्यांना लोकसाहित्याचे तर शाहीर अंबादास तावरे यांच्याकडून लोकसंगीताचे मार्गदर्शन लाभले आहे. डॉ.अमरजीत बाहेती या गेवराई येथील र.भ. अट्टल महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. समाधान इंगळे यांच्या पत्नी आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.

AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक १७ मार्च २०२६ पान -३


## गजानन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे विभागीय आयुक्तांनी केले कौतुक

नवगण राजुरी दि.१५ (प्रतिनिधी)-छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर महसूल मंडळ नवगण राजुरी अंतर्गत तळेगाव येथे संपन्न झाले. या कार्यक्रमात गजानन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषेत लेझील पथकाच्या माध्यमातून देशभक्तीचे प्रदर्शन सादर करून सहभाग घेतल्याबद्दल विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

बीड तालुक्यातील महसूल मंडळ नवगण राजुरी अंतर्गत मौजे तळेगाव येथे छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, अप्पर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, आदिंच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी गजानन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपारीक वेशभूषेत लेझीम पथकाच्या माध्यमातून देशभक्तीचे प्रदर्शन करून सहभाग नोंदवला. याचे प्रमुख पाहूण्यांनी कौतुक करून गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत पवळ यांच्या कार्याची प्रशंसा करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, तालुका शिक्षणाधिकारी समंदर खान यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शाळेला प्रवृत्त केले. यावेळी सर्व महसूल मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व तहसील कार्यालय बीडचे कर्मचारी उपस्थित होते.

## सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना पत्नीसह वर्षभर मोफत प्रवास

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी):- एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विधानभवन येथे महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या तक्रारी व मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आले. तसेच एस.टी.च्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

एसटी महामंडळात कार्यरत असलेल्या सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाने चालक-वाहकांवरील कारवाई, आगार व्यवस्थापनातील अडचणी तसेच काही प्रशासकीय प्रक्रियांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधले होते. या पार्श्वभूमीवर संघाचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक चर्चा केली. कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा हीच महामंडळाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विधानभवनातील दालनात झालेल्या या बैठकीत एस.टी. महामंडळाचे कामकाज अधिक पारदर्शक व प्रवासी तसेच कर्मचारी हिताचे करण्यावर विशेष भर देण्यात आला.

# एलसीबीने पकडला कारसह ६ लाख रु.चा अवैध गुटखा बाबाजी गायब होऊ लागला पण हिरा गोवाचे बस्तान कायम



### एसपी साहेब तपास करणाऱ्यांना मुळावर घाव घालायचा सांगा

**स्थानिक गुन्हे शाखा असो की इतर पोलीस अधिकारी कर्मचारी असोत त्यांनी जेव्हा अवैध गुटखा पकडला किंवा कोणतेही अवैध धंद्यावर कारवाई केली तर सुरुवातीस जे आरोपी सापडले जातील त्यांच्यावर कारवाई होते .परंतु सदर प्रकरणाचा तपास दुसऱ्या तपासणीक अधिका-याकडे दिल्यानंतर या धंद्याच्या पाठीशी नेमके कोण आहेत ? हे जनतेपर्यंत जात नाही. याचा अर्थ तेवढ्यापुरता तपास सीमित होत असल्याचे नागरिकांना वाटते. तेव्हा एस पी साहेब असे अवैध धंदे करणारे पकडल्यानंतर त्यांचे गॉड फादर कोण आहेत ? हे शोधण्यासाठी मुळावर घाव घालण्याची जरुरी असल्याचे मत यानिमित्ताने बोलताना एका नागरिकांनी व्यक्त केले.**

बीड दि १६ (प्रतिनिधी) -गेली काही दिवसापासून स्थानिक गुन्हे शाखा अवैध गुटख्याचा साठा अथवा वाहतूक करणाऱ्या अवैध धंदे चालका विरोधात हात धूवून पाठीमागे लागली आहे. याशिवाय काही ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी देखील कारवाया केल्या.यामूळे गेली दोन आठवड्यापासून बाबाजी गुटख्याची टंचाई निर्माण झाली. त्याचे भाव देखील उतरले परंतु कितीही कारवाया झाल्या तरी हिरा गोवा नावाचा गूटका टपरी पासून किराणा दुकानावर ठाण मांडून असतानाच स्थानिक गुन्हे शाखेने फुलाईनगर परिसरात कारमधून विक्रीसाठी गुटखा वाहतूक करणाऱ्या एका इसमाला ताब्यात घेतले असून त्याच्याकडून कारसह एकूण ६ लाख ६८ हजार १८४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी अवैध व्यवसाय करणारावर आपला तिसरा डोळा दाखवणे चालू केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेला या संदर्भात कडक कारवाया करण्याच्या सतत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड आणि त्यांचा फौज फाटा खब-यांना पेरून अवैध धंद्याची तंतोतंत माहिती घेताना दिसून येत आहेत. असे असतानाच त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, बीड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फुलाईनगर येथे एका MH-43/R-5725 स्विफ्ट कार मधून विविध कंपनींचा प्रतिबंधित गुटखा विक्रीसाठी नेला जात आहे.या माहितीच्या आधारे आज १६ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकला. यावेळी बीड तालुक्यातील औरंगपूर येथील रहिवासी व सध्या सुवर्णनगरी फुलाई नगर भागात राहत असलेल्या भाऊसाहेब राम पडुळे(वय ३४, याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या स्विफ्ट कारमध्ये विविध कंपनींचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला. पोलिसांनी कारसह एकूण ६ लाख ६८ हजार १८४ रू. किमतीचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी यावेळी केलेल्या प्राथमिक चौकशीत हा गुटखा बीड तालुक्यातील भाटसांगवी येथील रेवन्नाथ चादर याच्याकडून आणल्याचे पडुळे याने सांगितले असून तो सध्या फरार आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आठवडाभरात प्रतिबंधित गूटक्यावर केलेली ही दुसरी कारवाई आहे. दरम्यान ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वात फौजदार श्रीराम खटावकर, पोह राहुल शिंदे, युनुस बागवान, मपोह स्वाती मुंडे, पोअं अशपाक सय्यद, मनोज परजणे व चालक नितीन वडमारे यांनी संयुक्तपणे केली.

## पत्रकार श्रावणकुमार जाधव यांना मातृशोक

### शांताबाई जाधव यांचे निधन

केज दि.१६ (प्रतिनिधी):- तालुक्यातील लहुरी येथील श्रीमती शांताबाई देविदास जाधव वय ८५ यांचे रविवार दि. १५ मार्च रोजी



दुपारी २.३० वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्या झुंजारनेताचे केले तालुका प्रतिनिधी श्रावणकूमार जाधव यांच्या आई होत. त्यांच्या निधनाने लहुरी गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

त्यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी ७ वाजता गावातील सार्वजनिक स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्याची रक्कम १० लाख रुपये करावी -माजी आ. भीमराव धोंडे

आष्टी दि. १६(प्रतिनिधी)- शेतात काम करताना शेतकऱ्यांवर वाघ किंवा बिबट्या सारख्या वन्यप्राण्यांनी हल्ला करुन ठार केले तर त्या शेतकऱ्याच्या वारसदारांना शासनाच्या वतीने दहा लाख रुपये देण्यात येतात, त्याचप्रमाणे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे शेतकरी विमा ही रक्कम दोन लाखावरून दहा लाख रुपये करावी अशी मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केली.

आष्टी तालुक्यातील पिंपळा येथे आयोजित महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान कार्यक्रमात माजी आमदार भीमराव धोंडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर माजी आ. साहेबराव दरेकर, तहसीलदार वैशाली पाटील,



नायब तहसीलदार पांडुरंग माडेकर,दत्ता वाडेकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, भारत हा कृषिप्रधान देश आहे.शेती उत्पादनावर भारतीय अर्थव्यवस्था टिकून आहे परंतु शेतकऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या उत्पादित केलेल्या मालाला देखील भाव मिळत नाही तसेच शेतात काम करताना अनेक शेतकऱ्यांचा विविध प्रकारे अपघात होतो, त्यासाठी शासनाने स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना लागू केली परंतु त्यासाठी दोन लाख रुपये वारसांना दिले जातात, ही रक्कम अतिशय कमी आहे. ज्यावेळी एखाद्या शेतकऱ्यावर वाघ किंवा बिबट हल्ला करून ठार करतो त्या शेतकऱ्यांच्या वारसांना दहा लाख रुपये दिले जातात त्याप्रमाणे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात विमा रक्कमेत दहा लाख रुपयांपर्यंत पण वाढ करावी. याप्रसंगी माजी आमदार साहेबराव दरेकर तहसीलदार वैशाली पाटील व इतरांची भाषणे झाली.यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विवाद ग्रस्त प्रकरण निकाली काढून आदेश पारित करणे. फेरफार अदालत घेऊन ७/१२ वाटप करण्यात आले. . याप्रसंगी पांडुरंग गावडे, चिंतामण मोरे, रामदास शेंडगे, चंद्रकांत साके,संजय धायगुडे, सरपंच उध्दवराव मोढवे,सरपंच ज्ञानदेव सासवडे, सरपंच संजय रक्टाटे ,सरपंच- सागर दरेकर, सरपंच विकास अमृते,सरपंच योगेश शेळके, सरपंच सौ. सिमाताई भवर, सरपंच संजय विधाते, सरपंच राजेंद्र खुरंगे, अशोक कुताळ, चंद्रकांत शेंडगे, पत्रकार युवराज खटके, राजेंद्र शिंदे,हुसेन सय्यद, निखिल भवर, दादा विधाते , सरपंच बंकट परकाळे,सरपंच प्रदिप गव्हाणे, सरपंच भाऊसाहेब गावडे,सरपंच ईश्वर मेटे ,दादासाहेब झांजे यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## माजी अ.भीमराव धोंडे यांच्या निवासस्थानी 'दावत-ए-इफ्तार' संपन्न



आष्टी दि १६ (प्रतिनिधी)- पवित्र रमजान महिन्याच्या औचित्य साधून आष्टी येथे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेला 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रम शनिवार दि. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी उत्साहात व मोठ्या धार्मिक आणि सामाजिक वातावरणात संपन्न झाला.

'माजी आ. भीमराव धोंडे मित्र मंडळ, आष्टी-पाटोदा-शिरूर' यांच्या वतीने कार्यक्रमाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती.या प्रसंगी आष्टी शहरासह पंचक्रोशीतील विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय नेते, समाजसेवक, व्यापारी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी एकत्रितपणे इफ्तार करून रमजान महिन्याच्या पवित्र वातावरणात परस्परांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमामुळे आष्टी परिसरात सामाजिक सलोखा आणि ऐक्याची भावना अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## जगन्नाथ मंदीर वर्धापन दिनानिमित्त रथयात्रा व रामनवमी

बीड दि.१६ (प्रतिनिधी) - शहरातील स्वराज्यनगर भागातील जगन्नाथ मंदिराच्या



वर्धानदिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमांचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

यामध्ये दि.१९ मार्च गुरुवार पासून दुपारी ३ ते ६ या वेळेत रामकथा प्रारंभ होणार असून दि. २५ मार्च बुधवार रोजी कथेची सांगता होणार आहे.याच दिवशी कथा समाप्ती नंतर सायंकाळी ४ वाजता भव्य जगन्नाथ रथयत्रा काढण्यात येणार आहे.

दि. २६ मार्च गुरुवार रोजी मोठ्या उत्साहात रामनवमी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे .तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष गोलोक व्रंदावन दास महाराज व मंदीर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिक्षकांची पेन्शन रखडण्यास शिक्षणाधिकारीच जबाबदार

बीड दि. १६ (प्रतिनिधी):- शासनाच्या स्पष्ट निर्देशा नुसार सेवानिवृत्त शिक्षकांची पेन्शन दर महिन्याच्या एक तारखेलाच वितरित करणे बंधनकारक असताना, बीड जिल्ह्यात मात्र प्रशासनाच्या हलगर्जीपणा आणि आडमुठ्या कारभारामुळे अनेक शिक्षकांना अद्याप पेन्शन मिळालेली नाही. परिणामी जिल्ह्यातील वयोवृद्ध सेवानिवृत्त शिक्षक आर्थिक संकटात सापडले असून त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे याला शिक्षणाधिकारी जबाबदार असल्याचा आरोप केला जात आहे.



पेन्शनचे बजेट १८ फेब्रुवारी रोजी उपलब्ध झाले होते, मात्र प्रभारी शिक्षणाधिकारी श्रीमती कुवर यांच्या टेबलवर पेन्शनची फाईल तब्बल ८ दिवस पडून राहिली. या काळात संबंधित फाईलवर स्वाक्षरी करण्यात आली नसल्याने शिक्षकांची पेन्शन प्रक्रिया ठप्प झाली. या बाबत शिक्षकांनी विचारणा केली असता त्यांच्याशी अरेरावी केल्याचाही आरोप पुढे येत आहे. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली असली, तरी अद्याप संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही किंवा त्यांचा पदभार काढण्यात आलेला नाही, अशी नाराजी शिक्षक संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान १६ मार्च उलटून गेला तरीही शिक्षकांची पेन्शन वितरित झालेली नाही, ही बाब अत्यंत गंभीर मानली जात आहे. तरी प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच सेवानिवृत्त शिक्षकांची पेन्शन तातडीने वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा सर्व सेवानिवृत्त कर्मचारी संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## शिवरायांच्या पुतळा सुशोभीकरणासाठी चंद्रकला नाटकर यांनी दिली ५१ हजार रूपयाची रोख रक्कम



गेवराई दि.१६ (प्रतिनिधी):-- तालुक्यातील राक्षसभूवन शनीचे येथील शिवप्रेमी महिला चंद्रकला अंकुश नाटकर यांनी निराधार योजनेच्या आपल्या मानधनातून ५१ हजार रुपयाची रोख रक्कम छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा सुशोभीकरणासाठी देऊन प्रेरणादायी असे कार्य केले आहे. या उदात्त कार्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

. राक्षसभूवन येथे गेल्या महिन्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. या पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी निधीची गरज असताना चंद्रकला अंकुश नाटकर यांनी पुढाकार घेऊन संजय गांधी निराधार योजनेतून मिळालेल्या आपल्या मानधनातून ५१ हजार रुपयांची मदत दिली. त्यांच्या या कार्याबद्दल छत्रपती शिवाजी महाराज समिती राक्षसभूवन यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी समितीचे सदस्य डॉ.अमोल नाटकर, सहशिक्षक जालिंदर वाघमारे, युवानेते संतोष नाटकर, तानाजी नाटकर, नंदाताई काळे, संदीप नाटकर, जालू नाटकर, वैभव नाटकर, भारत नाटकर यांच्यासह अनेक शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# मोगलपुरा यंग पार्टीचा आदर्श इतर संघटनांनी घ्यावा - पो. नि. चौधरी

जामखेड दि १६ (प्रतिनिधी)- शहरातील जुनं जामखेड असलेल मोगलपुरा गल्लीत खाजमोद्दीन बाबा हा दर्गा प्राचीन कालापासून आहे . येथे मोगलपुरा यंग पार्टीने इफ्तार पार्टीचे आयोजन केले. यावेळी उपस्थित जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी बोलताना मोगलपुरा यंग पार्टीने खजमोद्दीन बाबा दर्ग्याचा उरूस हा रमजान महिन्यात आल्याने कोणताही गाजा वाजा न करता उपवासाची सांगता साध्या पद्धतीने व शांततेत साजरा करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे . त्यांचा आदर्श इतर संघटांनी घेणे ही काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले.

खाजमोद्दीन बाबा दर्गाच्या उरूस १३ मार्च रोजी होता परंतु हा उरूस रमजान महिन्यात आल्याने मोगलपुरा यंग पार्टीचे अध्यक्ष आबेद शेख व त्यांचा सदस्यांनी एक मोठा निर्णय घेतला कि रमजान महिन्यात हा उरूस आल्याने बॅन्जो ; ढोलीबाजा ; कवॉली ; मिरवणुक या गोष्टींना फाटा देत यास असंख्य कार्यक्रम रद्द करून उपवासाची सांगता म्हणजे इफ्तार पार्टीने केली. मुस्लीम बांधवानी रोजा सोडुन खाजमोद्दीन दर्ग्याला पोलीस निरिक्षक दशरथ चौधरी, माजी नगरसेवक अमित चिंतामणी, उपनगरध्याक्ष पोपट राळेभात, नगरसेवक प्राचार्य विकी घायतडक, मोहन पवार, अर्जुन म्हेत्रे,शिवसेना युवा नेते आकाश बाफना, अभियंता प्रदीप कटकधोंडे सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार, उमर कुरेशी, शिवकुमार डोंगरे, मुस्लीम पंच कमिटीचे अध्यक्षअझहर काझी, मुख्तार सय्यद, इस्माईल शेख ,हाजी नादीर शेख ,कॉंग्रेसचे प्रदेश सचिव राहुल उगले, वसीम कुरेशी, आरीफ शेख ,प्रदीप टाफरे, मयुर भोसले, सामाजिक कार्यकर्ते नासीर चाचु , जेष्ठ पत्रकार अशोक निमोणकर , सुदाम वराट , संजय वारभोग , विजय अवसरे , गोपनिय अधिकारी प्रकाश जाधव यांच्या हस्ते चादर चढवून मोठ्या आनंदाने उरूस साजरा केला यावेळी ज्येष्ठ नेते प्रा . मधुकर राळेभात ,माजी नगरसेवक अमित चिंतामणी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, कॉंग्रेसचे प्रदेश सचिव राहुल उगले ,विद्युत महामंडळाचे अभियंता प्रदीप कटक धोंड आकाश बाफना, प्राचार्य विकी घायतडक, प्रदीप टाफरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले . यावेळी मोगलपुरा यंग पार्टीचे अध्यक्ष आबेद शेख, सल्लागार ॲड. एजाज पठाण, वाजीद पठाण, समीर शेख, इकलास शेख ,आयान शेख, दानिश पठाण, आर्शद सय्यद, जिसान शेख ,अरमान शेख, नुमान शेख, आयान शेख, हिदायत शेख, तैफिक शेख, अदनान शेख, अफवान शेख, आमन खान, उबेद शेख, राहील शेख, शाहादात सय्यद, साहिल शेख,अंजर शेख, आशकान शेख , रिहान पठाण, शायान सय्यद,अफवान शेख , नुमान शेख आदिनी इफ्तार पार्टीमध्ये विशेष परिक्षम घेतले.

# संपादकीय

## एका रांगेतून दुसऱ्या रांगेत हेच प्राक्तन...

भारतीय राजकारणात सत्तांतर नेहमीच मोठ्या आशा निर्माण करते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत आले तेव्हा देशातील जनतेलाही अशाच मोठ्या अपेक्षा होत्या. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, निर्णायक नेतृत्व आणि वेगवान विकास यांची आश्वासने देत सत्तेत आलेल्या सरकारकडून सामान्य नागरिकांना स्थैर्य आणि सुबत्ता अपेक्षित होती. आधुनिक प्रचारतंत्र, सोशल मीडियाचा प्रभावी वापर आणि जनतेला भावणारी भाषणे या जोरावर मिळालेल्या बहुमतामुळे केंद्र सरकारकडे निर्णय घेण्याचे मोठे स्वातंत्र्य होते. परंतु गेल्या दशकात काही घटना अशा घडल्या की, ज्यांनी नागरिकांच्या दैनंदिन आयुष्यावर थेट परिणाम केला. नोटाबंदी, कोरोना महामारी आणि आता निर्माण झालेले गॅस संकट, या तीन वेगवेगळ्या प्रसंगांनी एक समान दृश्य वारंवार समोर आले ते म्हणजे प्रत्येकवेळी सामान्य नागरिकांना रांगेत उभे राहावे लागले. कधी बँकांसमोर, कधी किराणा दुकानांसमोर आणि आता गॅस एजन्सीसमोर. पश्चिम आशियात सुरू झालेल्या संघर्षाने जगातील ऊर्जा बाजारपेठ अस्थिर केली. खाडी देश हे जगातील सर्वात मोठे तेल आणि नैसर्गिक वायू उत्पादक आहेत. या प्रदेशातील युद्ध किंवा तणावाचा परिणाम जागतिक इंधन बाजारावर लगेच दिसून येतो. रिफायनरी, तेलवाहू जहाजे आणि महत्त्वाच्या सामुद्रधुनींवर हल्ले झाल्यास पुरवठा खंडित होतो. अलीकडील संघर्षातही असेच झाले. होर्मुझ सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाची ऊर्जा वाहतूक मार्गांपैकी एक आहे. जगातील मोठा हिस्सा असलेले कच्चे तेल याच मार्गाने विविध देशांपर्यंत पोहोचते. या मार्गावरील तणाव वाढल्याने तेल आणि गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला. परिणामी जागतिक बाजारात इंधन दर वाढू लागले. भारतासारख्या आयात आधारित देशाला याचा फटका बसणे अपरिहार्य आहे. देशातील मोठा ऊर्जा पुरवठा खाडी देशांवर अवलंबून आहे. त्यामुळे साहजिकच याचा भारतावर प्रतिकूल परिणाम झाला असून सर्वसामान्यांना याचे चटके बसू लागले आहेत. स्वातंत्र्यानंतर भारताने परराष्ट्र धोरणात 'अलिप्ततेची' भूमिका स्वीकारली होती. विविध शक्तींशी संतुलित संबंध ठेवत राष्ट्रीय हित जपणे हा त्या धोरणाचा गाभा होता. विशेषतः ऊर्जा पुरवठ्याच्या बाबतीत भारताने मध्यपूर्वेतील देशांशी दीर्घकालीन संबंध राखले. इराणसारखे देश भारतासाठी महत्त्वाचे ऊर्जा पुरवठादार राहिले आहेत. आर्थिक आणि राजनैतिक संबंधांमुळे ऊर्जा पुरवठ्यातील स्थैर्य टिकून राहिले. मात्र गेल्या काही वर्षांत जागतिक राजकारणातील बदलांमुळे या संतुलनावर परिणाम झाला. पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र होत असताना भारताने कोणती भूमिका घ्यावी याबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले. जागतिक शक्तींच्या दबावाखाली किंवा बदलत्या राजनैतिक समीकरणांमुळे ऊर्जा पुरवठा व्यवस्थेत अनिश्चितता निर्माण झाली, असे काही विश्लेषकांचे मत आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर काही काळ भारताकडे येणाऱ्या तेलवाहू जहाजांच्या हालचालींवरही परिणाम झाला. होर्मुझ सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांबाबत निर्माण झालेल्या अडचणींमुळे पुरवठा साखळीवर ताण आला. या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम देशांतर्गत बाजारात दिसू लागला. घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ झाली. व्यावसायिक सिलिंडरच्या दरातही सरकारने वाढ केली आणि लगेचच नोंदणी आणि पुरवठा बंद केला. काही भागांत घरगुती वापराच्या गॅसचा पुरवठा कमी झाल्याच्या तक्रारी येऊ लागल्या. गॅस हा आज घराघरातील स्वयंपाकाचा मुख्य आधार आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील लाखो कुटुंबे स्वयंपाकासाठी एलपीजीवर अवलंबून आहेत. त्यामुळे सिलिंडर मिळण्यात अडचण निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम दैनंदिन जीवनावर होतो. काही शहरांमध्ये गॅस बुकिंग करताना अडथळे येऊ लागले. पुरवठा उशिरा होत असल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढली. अनेक ठिकाणी गॅस एजन्सीजसमोर लोक सिलिंडर घेऊन रांगेत उभे असल्याचे दृश्य दिसू लागले. छोट्या शहरांपासून महानगरांपर्यंत हीच परिस्थिती दिसू लागल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. गॅस संकटाचा फटका केवळ घरगुती वापरापुरता मर्यादित राहिला नाही. हॉटेल, रेस्टॉरंट, लघुउद्योग आणि विविध सेवा क्षेत्रांमध्ये एलपीजीचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. व्यावसायिक सिलिंडरच्या दरवाढीमुळे या क्षेत्रातील खर्च वाढला. बहुतांश ठिकाणी पुरवठा खंडित झाल्याने हॉटेल आणि खानावळी चालविणाऱ्यांना अडचणी निर्माण झाल्या. उद्योगधंद्यांमध्ये उत्पादन खर्च वाढल्याने त्याचा परिणाम ग्राहकांवरही झाला. आधीच महागाई आणि आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर हे संकट आले. त्यामुळे लहान व्यावसायिक आणि सेवा क्षेत्रातील कामगार यांच्यावर अतिरिक्त दबाव निर्माण झाला. भारतीय समाजात 'रांग' हे एक प्रतीक बनले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था असो, रेल्वे तिकिटे असोत किंवा बँक व्यवहार रांग हा दैनंदिन अनुभव आहे. परंतु जेव्हा अत्यावश्यक सेवांसाठी मोठ्या प्रमाणावर रांगा लागतात तेव्हा त्या केवळ व्यवस्थापनातील अडचणींचे नव्हे तर व्यापक धोरणात्मक प्रश्नांचे प्रतीक ठरतात. नोटाबंदीच्या काळात लोकांना आपल्या पैशांसाठी बँकांसमोर रांगेत उभे राहावे लागले. लॉकडाऊनच्या काळात अन्नधान्य, जीवनाश्यक वस्तू, औषधांसाठी रांगा लागल्या आणि आता गॅस पुरवठ्याच्या अडचणींमुळे लोक पुन्हा सिलिंडर घेऊन एजन्सीसमोर रांगेत उभे राहिलेले दिसतात. या दृश्यांमधून एक प्रश्न उपस्थित होतो, प्रत्येक संकटाच्या वेळी सामान्य नागरिकांनाच का सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो? भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी ऊर्जा सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. औद्योगिक विकास, वाहतूक व्यवस्था आणि घरगुती वापर या सर्व क्षेत्रांसाठी ऊर्जा पुरवठा स्थिर असणे आवश्यक आहे. यासाठी दीर्घकालीन धोरणांची आवश्यकता असते. विविध देशांमधून ऊर्जा आयात, पर्यायी ऊर्जास्रोतांचा विकास, साठवण व्यवस्था आणि पुरवठा साखळीची मजबुती या सर्व बाबींचा समन्वय आवश्यक असतो. पश्चिम आशियातील संघर्षासारख्या परिस्थितींसाठीही पूर्वतयारी असणे गरजेचे आहे. ऊर्जा आयातीचे विविधीकरण आणि राजनैतिक संतुलन राखणे हे या संदर्भात महत्त्वाचे ठरते. कोणतेही संकट निर्माण झाल्यावर प्रशासनाचा वेगवान प्रतिसाद आणि पारदर्शक संवाद अत्यंत महत्त्वाचा असतो. नागरिकांना स्पष्ट माहिती मिळाल्यास अस्वस्थता कमी होते. पुरवठा व्यवस्थेबाबत विश्वास निर्माण करणेही तितकेच आवश्यक असते. गॅस संकटाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पुरवठ्याची खात्री देणे, वितरण व्यवस्थेतील अडथळे दूर करणे आणि पर्यायी उपाय शोधणे या गोष्टी तातडीने करणे आवश्यक आहे, पण दुर्दैवाने ते होताना दिसत नाही. त्याऐवजी सूत्रांच्या हवाल्याने वृत्तवाहिन्यांवरून खोट्या बातम्या पसरवून जनतेची फसवणूक केली जात आहे. जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था झाल्याच्या गप्पा मारणारे सरकार आपल्या नागरिकांना एलपीजी सिलिंडरही देऊ शकत नाही ही देशाची सध्याची अवस्था आहे. आज देशासमोर उभे असलेले गॅस संकट हे केवळ तात्पुरते इंधन संकट नाही; ते शासनशैली, परराष्ट्र धोरण आणि ऊर्जा व्यवस्थापन या सर्वांशी जोडलेले आहे. रांगा हे कोणत्याही समाजातील अस्थिरतेचे दृश्य प्रतीक असतात. जेव्हा नागरिकांना अत्यावश्यक सेवांसाठी वारंवार रांगेत उभे राहावे लागते, तेव्हा त्या मागील धोरणात्मक प्रश्नांकडे लक्ष देणे आवश्यक ठरते. भारतातील लोकशाहीची ताकद ही तिच्या जनतेत आहे. त्यामुळे शासनाने घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा केंद्रबिंदू नागरिकांचे जीवन सुलभ करणे हाच असला पाहिजे. ऊर्जा सुरक्षा, प्रशासनिक तयारी आणि संतुलित परराष्ट्र धोरण यांचा योग्य मेळ घालूनच अशा संकटांना तोंड देता येईल. अन्यथा देशाला पुन्हा पुन्हा अशा परिस्थितीला सामोरे जावे लागू शकते जिथे नागरिकांना एका रांगेतून दुसऱ्या रांगेत उभे राहण्याची वेळ येते.


## सार्वजनिक भीम जयंती मंडळ डॉ. आंबेडकर नगरची कार्यकारिणी जाहीर

नांदेड : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकर नगर येथे सार्वजनिक भीम जयंती मंडळाची बैठक उत्साहात पार पडली. ही बैठक नगरसेवक सत्यपाल सावंत आणि नगरसेवक राहुल सोनसळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी अशोक कांबळे होते.या बैठकीत आगामी भीम जयंती उत्सव मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध आणि समाजोपयोगी उपक्रमांसह साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच मंडळाची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नवीन कार्यकारिणीनुसार अध्यक्षपदी सिद्धोधन सावंत, उपाध्यक्षपदी अभिजीत गायकवाड, कोषाध्यक्ष पदी सुभाष कांबळे, सचिवपदी संदेश मोरे तर संघटकपदी देवानंद मोगले यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून शादु लोणे यांची निवड झाली आहे. सर्व कार्यकारणी निवड बिनविरोध करण्यात आली.मंडळाचे सल्लागार म्हणून ईश्वर सावंत, अशोक कांबळे, चंद्रकांत कांबळे, सुभाष गजभारे आणि किशोर हटकर यांची नियुक्ती करण्यात आली. या बैठकीला वार्डातील अनेक ज्येष्ठ नागरिक तसेच तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सर्वांच्या सहमतीने ही कार्यकारिणी निवडण्यात आली. यावेळी भीम जयंती उत्सव समाजातील सर्व घटकांना एकत्र आणणारा आणि आदर्श पद्धतीने साजरा करण्याचे आवाहनही पदाधिकाऱ्यांनी केले.

## कॉ. महादेव नागरगोजे यांनी केला फसवी कर्जमाफी म्हणून जाहीर निषेध

पाटोदा दि १६ (प्रतिनिधी)- गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजपच्या महायुती सरकारने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू असे मोठे आश्वासन देऊन राज्यातील शेतकऱ्यांची मते मिळवली आणि सत्तेवर विराजमान झाले. मात्र सत्तेत आल्यानंतर सरकारने त्या आश्वासनाची अंमलबजावणी न करता उलट शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचे काम केले आहे. नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अर्थसंकल्प सादर करताना सरकारने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली कर्जमाफी ही अत्यंत तुटपुंजी, अपुरी व फसवी स्वरूपाची असल्याचा आरोप भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेचे नेते कॉ. महादेव नागरगोजे यांनी करून फसवी कर्जमाफी म्हणून जाहीर निषेध केला.

सरकारने जाहीर केलेल्या या निर्णयानुसार सन २०२५ मध्ये ३० जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत थकबाकीत असलेल्या शेतकऱ्यांनाच कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील मोठ्या प्रमाणावर असलेल्या शेतकऱ्यांना या कर्जमाफीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. अनेक शेतकऱ्यांनी या काळात बँकांच्या सल्ल्याने किंवा दबावाखाली त्यांच्या कर्जाचे पुनर्गठन केले आहे. परंतु अशा पुनर्गठन केलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ न देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे हजारो शेतकरी या योजनेपासून दूर राहणार असून ही बाब शेतकऱ्यांवरील अन्यायकारक व क्रूर अशी आहे.विशेष म्हणजे २०२५ मध्ये ३० जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत अनेक शेतकऱ्यांचे कर्ज पुनर्गठन करण्यात आले. हे पुनर्गठन महाराष्ट्र शासन, मुख्यमंत्री कार्यालय, राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, सेवा सहकारी सोसायट्या आणि जिल्हा मध्यवर्ती बँका यांच्या संगनमताने आणि अप्रत्यक्ष आदेशानुसार करण्यात आले असल्याचा आरोप करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना कर्ज पुनर्गठन करण्यासाठी जबरदस्तीने भाग पाडण्यात आले. त्यामुळे आज अशा हजारो शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवण्याचे काम सरकारकडून केले जात आहे.राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण अजूनही थांबलेले नाही. अशा गंभीर परिस्थितीत सरकारने आतापर्यंत तीन वेळा कर्जमाफी जाहीर केली असली तरी त्याचा प्रत्यक्ष लाभ फारच कमी शेतकऱ्यांना मिळाला आहे. आता पुन्हा सरकारने जाहीर केले आहे की, ज्या शेतकऱ्यांनी नियमितपणे कर्जफेड केली आहे त्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाईल. मात्र ही घोषणा देखील शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी असून ती प्रत्यक्षात फारच मर्यादित स्वरूपाची आहे. त्यामुळे हीदेखील शेतकऱ्यांची फसवणूक असल्याचा आरोप करण्यात आला आहे.याशिवाय देशातील केंद्र व राज्य सरकारची आर्थिक व व्यापार धोरणे देखील शेतकरीविरोधी असल्याची टीका करण्यात आली आहे. अलीकडेच अमेरिकेसोबत झालेल्या आयात-निर्यात धोरणावरून हे स्पष्ट झाले आहे की, या देशातील सरकारे मोठ्या उद्योगपती व धनिक वर्गाच्या हितासाठी काम करत आहेत. अमेरिकन मालावर आयात शुल्क सुमारे १८ टक्के ठेवले जात असताना भारतीय मालावर निर्यात शुल्क शून्य टक्के ठेवण्याचे धोरण राबवले जात आहे. त्यामुळे भारतीय शेती आणि शेतकरी यांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. या धोरणातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे मंडलीकत्व स्वीकारल्याचे दिसून येत असल्याची टीकाही करण्यात आली आहे.या सर्व पार्श्वभूमीवर राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी लढा उभारणे आवश्यक असल्याचे सांगत भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने या फसव्या कर्जमाफीचा जाहीर निषेध करण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने तात्काळ गांभीर्याने लक्ष देऊन सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, कर्ज पुनर्गठन केलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ द्यावा आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीला न्याय देणारी ठोस धोरणे राबवावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा किसान सभेचे नेते कॉ. महादेव नागरगोजे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.



## मान्यवरांच्या उपस्थितीत माजी सैनिक चंद्रकांत कसबे यांचा वाढदिवस साजरा



केज दि १६(प्रतिनिधी)- माजी सैनिक तसेच एस बी आय बँक केज येथील माजी कर्मचारी चंद्रकांत ज्ञानोबा कसबे कोरेगाव यांचा वाढदिवस बीडरोड येथील पोलीस स्टेशन परिसरात सायंकाळी ७ वाजता उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. देशसेवा, शिस्तबद्ध जीवनशैली आणि समाजाप्रती असलेली आपुलकी यामुळे चंद्रकांत कसबे हे परिसरात प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याचा गौरव करत उपस्थित मान्यवरांनी त्यांना वाढदिवसा निमित्त हार्दिक शुभेच्छा देत उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, मित्र परिवार, पत्रकार बांधव व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते बाबुराव गालफाडे, प्रा. रमेश पाटोळे, आसाराम बाबर, आझाद क्रांती सेनेचे तालुका प्रमुख शरद थोरात, पत्रकार प्रदीप गायकवाड, लिंबराज गायकवाड, डॉ. क्षीरसागर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून चंद्रकांत कसबे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांनी चंदू कसबे यांच्या समाजाभिमुख कार्याचे कौतुक करत पुढील काळातही ते समाजा साठी प्रेरणादायी कार्य करत राहावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. वाढदिवसाचा कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला.

## वंडरबॉय वल्लभ मोगरेकरची पुणे येथील स्थानिक स्पर्धेत शानदार कामगिरी

माजलगाव दि.१६(प्रतिनिधी):-साडेपाच वर्षीय प्रतिभावंत खेळाडू वल्लभ कुलकर्णी मोगरेकर याने उत्कृष्ट कामगिरी करून आपली प्रतिभा पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. दिनांक १५ रोजी महिला दिन निमित्त खुल्या आणि वयोगट रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन सिहगड लॉ कॉलेज मध्ये करण्यात आले होते वयोगट ८ वर्षाखालील गटामध्ये वल्लभ ने सहभाग नोंदवला होता पुण्यातील अतिशय तयारी करून आलेल्या स्पर्धकां सोबत वल्लभ चा विविध फेऱ्या मध्ये सामना होणार होता त्याच्या वयोगटात अनेक स्पर्धकानी सहभाग नोंदवला होता सुरुवातीचे तिन्ही राऊंड जिंकून निर्विवाद आघाडी घेतली होती चौथ्या सामन्यातील एक छोट्या चुकीमुळे त्याला सामना गमावला लागला मात्र अंतिम सामन्यात आरव बोरा या चांगल्या खेळाडू सोबत त्याने बरोबरी साधून या स्पर्धेत त्याने तृतीय क्रमांक मिळवून कॅश प्राईझ सोबत ट्रॉफी जिंकली या स्पर्धेचे आयोजन इंटरनॅशनल अरबीटीर श्रद्धा विंचवेकर होत्या या स्पर्धे मध्ये जवळपास ५० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता विविध गटात १६० पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभागी होते. वल्लभ च्या या यशाबद्दल त्याचे छत्रपती संभाजीनगर येथील त्याचे प्रशिक्षक अमरदीप तिवारी आणि अमरीश जोशी तसेच पत्रकार उमेश मोगरकर आणि लक्ष्मीकांत जोशी यांनी विशेष कौतुक केले आहे.




## छत्रपती संभाजीनगर येथील भदंत ग्यानरक्षित थेरो यांची गुरूवारी धम्मदेसना

नांदेड - फाल्गुन पौर्णिमा ही मार्च महिन्यामध्ये येते. या पौर्णिमेला राजा सिद्धोधन यांच्या निमंत्रणावरुन तथागत भगवान गौतम बुद्ध हे बुद्धत्व प्राप्त केल्यानंतर पहिल्यांदाच कपिलवस्तू या ठिकाणी आपल्या जन्म गावास भेट दिली. या ठिकाणी सिद्धार्थ गौतम बुद्ध भिक्षाटन करत असतांना पाहून राजा सिद्धोधनास दुःख झाले. त्यावेळेस तथागत भगवान गौतम बुद्ध आणि सांगितलं की, आमचा बुद्ध वंश आहे; राजवंश नाही. चारिका करण्याची परंपरा तथागत गौतम बुद्धांनी पाळली. नंतर राजा सिद्धोधन भगवान गौतम बुद्ध आणि बुद्ध संघास भोजनाचे निमंत्रण दिले आणि भोजनानंतर तथागत भगवान गौतम बुद्धाने प्रवचन दिले. या प्रवचनानंतर राजासिद्धोधन स्रोतापन्न झाले याच भेटीच्या नंतर सिद्धार्थ गौतम बुद्ध यांचा मुलगा राहूल, चुलत भाऊ आनंद आणि देवदत्त हेही बौद्ध भंते झाले. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात १९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वा. फाल्गुन पौर्णिमेनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील भदंत ग्यानरक्षित थेरो यांची प्रमुख धम्मदेसना या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक धम्मगुरू भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली.

## सौ. रेखा तळणीकर समाज गौरव पुरस्काराने सन्मानित

अंबाजोगाई दि १६ (प्रतिनिधी)- येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा संजय घोडावत आयआयटी अँड मेडिकल अकॅडमी च्या संचालिका सौ.रेखा अविनाश तळणीकर यांना जागतिक महिला दिनी कर्तुत्ववान महिला म्हणून समाज गौरव पुरस्काराने शाल, श्रीफळ, व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.येथील सामाजिक कार्यकर्त्या तथा संजय घोडावत आयआयटी अँड मेडिकल अकॅडमी च्या संचालिका सौ.रेखा अविनाश तळणीकर यांना जागतिक महिला दिनी कर्तुत्ववान महिला म्हणून समाज गौरव पुरस्काराने शाल, श्रीफळ, व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले .लातूर येथील दशनाम गोसावी समाजाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात करण्यात आले होते. सौ. रेखा अविनाश तळणीकर या इनरव्हील क्लब अंबाजोगाईच्या पदाधिकारी आहेत. संजय घोडावत आयआयटी अँड मेडिकल अकॅडमीच्या संचालिका इनरव्हील क्लब म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे काम केले आहे.अकॅडमी मार्फत हुशार व गरजू विद्यार्थ्यांना आतापर्यंत वीस लाख रुपये स्कॉलरशिप दिलेली आहे.तसेच आयआयटी व मेडिकल अकॅडमीच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी आयआयटी व मेडिकलला लागलेली आहेत. इनरव्हील क्लब च्या माध्यमातून वैयक्तिक, गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी गणवेश, शालेय साहित्य व आर्थिक मदत त्या करतात. तसेच निराधार व गरजू महिलांना राशन कपडे व आर्थिक मदत हि दिली जाते.त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले .त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## 'नारी शक्ती तुमच्या कर्तृत्वाला सलाम' बीडमध्ये डान्स स्पर्धा उत्साहात संपन्न



बीड दि १६ (प्रतिनिधी)- जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नारी शक्ती तुमच्या कर्तृत्वाला सलाम या प्रेरणादायी ब्रीदवाक्याखाली म्हाळसा महिला प्रतिष्ठान आयोजित आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संकल्पनेतून बीड येथे भव्य डान्स स्पर्धा संपन्न झाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या वतीने हा कार्यक्रम हॉटेल ओलिओ येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेमध्ये दोन गट करण्यात आले होते. पहिला गट १० ते १७ वयोगटातील मुलींसाठी तर दुसरा गट १८ वर्षे व त्यापुढील महिलांसाठी ठेवण्यात आला होता. दोन्ही गटांमध्ये मोठ्या संख्येने महिला व मुलींनी सहभाग नोंदवून आपल्या नृत्यकलेचे उत्कृष्ट सादरीकरण केले. स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली होती. लहान गटासाठी प्रथम पारितोषिक ७,००० रुपये, द्वितीय ५,००० रुपये आणि तृतीय ३,००० रुपये असे ठेवण्यात आले होते. तर मोठ्या गटासाठीही प्रथम ७,००० रुपये, द्वितीय ५,००० रुपये आणि तृतीय ३,००० रुपये अशी रोख पारितोषिके देण्यात आली. याशिवाय मोठ्या गटातील उत्तेजनार्थ विजेत्यांसाठी तीन पैठणी साड्यांचे विशेष बक्षीस ठेवण्यात आले होते.या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. स्पर्धेचे परीक्षक व पर्यवेक्षक म्हणून प्राध्यापिका दुष्यंता रामटेके मॅडम, पत्रकार देवेंद्र ढाका, समीर काझी तसेच आनंद वीर यांनी काम पाहिले.स्पर्धेत सहभागी झालेल्या महिला व मुलींनी आपल्या नृत्यकौशल्याने प्रेक्षकांची मने जिंकली. १० ते १७ वयोगटातील स्पर्धेत प्रथम क्रमांक अद्विता कांबळे हिने पटकावला. द्वितीय क्रमांक विभागून अन्वी सोनवणे व अनुष्का मस्के यांना देण्यात आला, तर तृतीय क्रमांक विभागून अक्षरा मोठे आणि काव्य डोंगरे यांना देण्यात आला.१८ वर्षांवरील गटामध्ये अनामिका अहिरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक विभागून डॉ. मंजुश्री दुलारवर आणि अंकिता जाधव यांना देण्यात आला. तर तृतीय क्रमांक विभागून श्वेता अवसरमल आणि पायल वंजारे यांना देण्यात आला.मोठ्या गटातील उत्तेजनार्थ पुरस्कार म्हणून सोनम धुताळमल, आरती मोरे आणि सारिका पवार यांना पैठणी साड्या प्रदान करण्यात आल्या. तसेच या स्पर्धेत उत्कृष्ट नृत्य सादर करणाऱ्या पूर्वी कांबळे, श्रेया वारे, सई वाघमारे, कोमल तुरुकमारे आणि सोनल कांबळे यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

## मनोज पवार सर यांच्या वतीने इफ्तार पार्टी संपन्न

पिंपळवंडी दि.१६(प्रतिनिधी)-पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम बांधवांना सामूहिक प्रार्थना करून इफ्तार पार्टीचे अंमळनेर येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात मनोज पवार सर यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.या वेळी इफ्तार पार्टीत शेकडो हिंदू-मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.रमजान महिन्यात मुस्लिम बांधव उपवास करतात.उपवास सोडण्यासाठी रोजा इफ्तारचे आयोजन केले जाते.अनेक मुस्लिम बांधवांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम बांधवांना सामूहिक प्रार्थना करून इफ्तार पार्टीचे अंमळनेर येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात मनोज पवार सर यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.या वेळी इफ्तार पार्टीत शेकडो हिंदू-मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.रमजान महिन्यात मुस्लिम बांधव उपवास करतात.उपवास सोडण्यासाठी रोजा इफ्तारचे आयोजन केले जाते.अनेक मुस्लिम बांधवांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले..यावेळी अंमळनेर पोलीस स्टेशनचे कर्मचारी पी.एस. आय चव्हाण, बहिरवाळ, मनोज पवार सर,पिनू पोकळे, शफिक शेठ इनामदार, शब्बीर बागवान,सत्तार आत्तार, कादरभाई ताबोळी, इम्रान पठाण, हुसेन ताबोळी, शेख चाचा,अहमद पठाण, अहमद सय्यद,शोकत बागवान, सलमान आत्तार, मुन्ना सय्यद,सोमा पांगरे,मुरलीधर पवार,विक्रम पवार,ऋषी पवार,अमीर इनामदार, मुबारक,अमन सय्यद,मोबीन बागवान,फिरोज बागवान,प्रशांत पवार, भागवत नवले,विठ्ठल नवले, अभिजित पाथरूडकर,अनिल हडतगुणे,अण्णा पवार तसेच पाटोदा तालुका ग्रामीण पत्रकार संघ,पत्रकार बबन उकांडे,भाऊसाहेब पवार, चंद्रकांत पवार,शेखर पवार,विशाल पोकळे,अविराज पवार,नितीन पवार आदीजण उपस्थित होते.





बीड -जालना येथ नवनिर्वाचित नगर सेवक महेश सुखरामानी,अजित गेही व डॉ गुरुमुख जगवानी यांचा अमर शहिद संत कंवरराम मिशनतर्फे सत्कार करताना डॉ.मदन जेसवाणी,ईश्वर टेकवाणी.

## माणुसकी जपणारा ज्येष्ठ नेत्रसेवक हरपला ; राजकुमार निरगुडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

बीड दि.१६(प्रतिनिधी):- बीड शहरात डोळ्यांच्या आजारासाठी विश्वासाने घेतले जाणारे नाव म्हणजे ज्येष्ठ नेत्रसेवक राजकुमार निरगुडे. साधेपणा, माणुसकी आणि रुग्णांविषयी असलेली अपार आपुलकी यामुळे त्यांनी हजारो रुग्णांच्या मनात वेगळी जागा निर्माण केली होती. त्यांच्या निधनामुळे बीड शहराने एक संवेदनशील आणि माणुसकी जपणारा नेत्रसेवक गमावला आहे. लोक त्यांना प्रेमाने डॉक्टर असे म्हणायचे. शहरात कोणालाही डोळ्यांचा त्रास झाला की सहजपणे लोकांच्या तोंडी एकच वाक्य असायचे - अरे, सरकारी दवाखान्यात राजाभाऊ निरगुडे आहेत ना त्यांना जाऊन भेट. कारण ते केवळ कर्मचारी नव्हते, तर प्रत्येक रुग्णाला आपला माणूस समजून सेवा देणारे होते. ओळखीचा असो वा अनोळखी, प्रत्येकाशी भाऊ, बहीण किंवा आईप्रमाणे वागून त्यांनी रुग्णांची तपासणी केली.अत्यल्प खर्चात रुग्णांची तपासणी करून चष्मा करून देणे, गरीब रुग्णांची विशेष काळजी घेणे ही त्यांची खास ओळख होती. त्यामुळे अनेक कुटुंबांशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते.सरकारी सेवेतून केवळ दोन वर्षांपूर्वीच ते निवृत्त झाले होते. आयुष्यभर जबाबदार्यांमध्ये गेलेले त्यांचे आयुष्य आता परिवार आणि मित्रांसोबत थोडा वेळ घालवण्याच्या टप्प्यावर आले होते. पण नियतीने अचानक त्यांना हिरावून घेतले.आज सरकारी दवाखान्यातील त्या विभागात गेल्यावर त्यांची उणीव कायम जाणवत राहील. बीड शहराने आज माणुसकी जपणारा, रुग्णांना आपले मानणारा ज्येष्ठ नेत्रसेवक गमावला आहे अशी भावना जनसामान्यातून ऐकण्यास मिळत आहे. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.



# बीड येथील कृषी प्रदर्शनात येणार थेट शेतकऱ्यांनी पिकवलेले विक्रीसाठी धान्य

## शेतमजुरीला पर्याय ठरणारे अवजारे दालन ठरणार आकर्षण

बीड (प्रतिनिधी): मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या वर्षी प्रथमच बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडागणा मध्ये दिनांक ०३ ते ०६ एप्रिल दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शनात द्वारे बीड भव्य अशा ४ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. प्रदर्शन जय्यत तयारी सुरू असून यंदा कृषी प्रदर्शनामध्ये २०० अधिक स्टॉलचा सहभाग असणार आहे यात विशेष आकर्षण ठरणार आहे ते म्हणजे शेतमजुरीला पर्याय ठरणारे अवजारांचे चालन विविध लागणारे निळ्या खुरप्यापासून तो ऊस तोडणी यंत्रापर्यंत सर्व प्रकारच्या मजुरीला पर्याय ठरणाऱ्या अवजाराचे दालन विशेष आकर्षण ठरणार आहे तर शेतकऱ्याने आपल्या शेतामध्ये उत्पादित केलेला माल थेट स्वतः शेतकरी या प्रदर्शनात धान्य महोत्सवाच्या माध्यमातून विक्री करण्यासाठी ठेवणार आहेत या अनुषंगाने प्रदर्शनाची जय्यत तयारी सुरू असून या प्रदर्शनाचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आव्हान कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोली सह इतर ठिकाणी या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करते बीड जिल्ह्यातील शेतकर्यांच्या आग्रहाने गेवराई पाठोपाठ बीड येथे या प्रदर्शनाचे आयोजन प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन, ओंकार साखर कारखाना, ऑल इंडिया डीलर ॲग्रो इनपुट असोसिएशन यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे.

### शेतकऱ्यांना दिला जाणार मोफत स्टॉल

शासनाच्या मदतीविना हे प्रदर्शन होत असून गेल्या १८ वर्षापासून शासनाच्या कोणत्याही अनुदानाशिवाय ही संस्था हे प्रदर्शन सातत्याने आयोजित करते यावेळी प्रथमच जिल्ह्यातील उत्कृष्ट दर्जाचा उत्पादित केलेला धान्य माल थेट ग्राहकांच्या च्या दारात मिळावा या उद्देशाने शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिला जाणार आहे तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम करणाऱ्या संस्थांना अल्प दरात स्टॉल दिला जाणार आहे स्टॉल बुकिंग साठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा ९८८१०४५३१५,९४२२२९४३३८,८६००४७४६०६

कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात द्वारे तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहे, एकदिवसीय पशुप्रदर्शन, डॉग शो तज्ज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार आहे विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्धाटन व समारोप प्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा या शेतक यांचा गौरव करण्यात येणार आहे. प्रदर्शनात विविध कार्यक्रमाचे रिसेल चालणार असून ४ दिवसांमध्ये या प्रदर्शनाचा बीड शहरासह जिल्ह्यातील शेतकर्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

# मोदी टेक्नॉलॉजी वापरा अन् गॅस टंचाई दूर करा

## सरकारच्या निषेधार्थ डॉ.ढवळे यांचे आंदोलन

बीड दि.१६(प्रतिनिधी): केंद्र सरकारच्या धोरणांमुळे गॅस टंचाई निर्माण झाली असून गॅस दरवाढ आणि व्यावसायिक गॅसवरील निर्बंधांमुळे खाणावळी बंद पडण्याच्या स्थितीत आल्या आहेत. तसेच घरगुती गॅस सिलेंडरसाठी ऑनलाईन बुकिंग बंद असल्याने ग्राहकांना रांगेत तासनतास उभे राहावे लागत असल्याने सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन करण्यात आले. जिल्हा प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान समाधान शिबिर प्रमाणेच मोदी टेक्नॉलॉजीचा प्रचार, प्रसार करून गॅस टंचाई दूर करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

या आंदोलनात मोदी टेक्नॉलॉजी वापरा आणि गॅस टंचाई दूर करा या घोषणेसह नाल्यातून निघणाऱ्या गॅसवर चहा बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. नाल्याच्या गॅसवरील चाय पे चर्चा या लक्ष्यवेधी आंदोलनाद्वारे केंद्र सरकार व जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला.सरकार आणि जिल्हा प्रशासन गॅस टंचाई नसल्याचे सांगून ग्राहकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. या संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, मुबीन शेख, बाळासाहेब मोरे पाटील , सादेक सय्यद , रामधन जमाले , गणेश धोंडरे, राजेंद्र आमटे, प्राचार्य डी.जी.तांदळे आद सहभागी होते. यावेळी डॉ ढवळे यांनी नमूद केले की, जिल्हा प्रशासनाने गॅसच्या सुरळीत वितरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असुन पोलिस अधीक्षक सचिव आहेत.या समितीकडे नियंत्रण, सुरळीत पुरवठ्याची जबाबदारी दिली असुन साठेबाजी करणा-यांवर जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे. त्याऐवजी जिल्हा प्रशासनाने मोदी टेक्नॉलॉजी द्वारे गॅस टंचाई दूर करावी यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान समाधान शिबिर प्रमाणे जिल्हाभरात अभियान राबवत गॅस टंचाई ग्राहकांचे समाधान करावे अशी उपरोधिक टीका डॉ.ढवळे यांनी केली आहे.

## रमेश आडसकर यांच्या उपस्थितीत सोनिजवळा येथे इफ्तार पार्टी संपन्न

केज दि १६(प्रतिनिधी) - तालुक्यातील व येथून जवळच असलेल्या सोनिजवळा येथे मुस्लीम समाज व समस्त गावकरी बांधव यांच्या वतीने आयोजित ईफ्तार पार्टीस रमेश आडुस्कर यांच्यासह मान्यवर नेत्यांची उपस्थिती लाभली .

यावेळी युवा नेते ऋषीकेश भैय्या आडसकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर भैय्या पाटील, युवा नेते रणजितदादा आडसकर,ऊ गावचे सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे तालुका अध्यक्ष गोविंद ससाणे, संतोष क्षिरसागर, डोईफोडे, बाबू गायकवाड, भागवत कोकाटे, बालासाहेब कोकाटे, बंडू कोकाटे, प्रताप वैरागे, महादू वसेकर, बाळासाहेब ससाणे, सोमनाथ ससाणे, अशोक दादा वैरागे, स्वामी विवेकानंद शाळेचे सचिव शंकरजी पाखरे, अविनाश ससाने, माजी मंडळाधिकारी भागवत पवार, मधुकर पटेकर, सोनिजवळा गावचे ग्राम रोजगार सेवक अरुण पटेकर, अरबाज पठाण, लाईक पठाण, विशाल सूर्यवंशी, व्हॉइसचे अरमन हुसेन पटेल, पांडुरंग ससाणे, कार्यक्रमाचे अयोजक अंबा साखर कारखान्याचे संचालक मिनाज पटेल व गावातील सर्व जाती धर्मातील ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज, महाराजस्व समाधान शिबिर अभियान संपन्न

किट्टी आडगाव दि १६(प्रतिनिधी)- माजलगाव तालुक्यातील किट्टीआडगाव येथे महसूल मंडळ आणि ग्रामपंचायत कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर शनिवार दि. १४ रोजी संपन्न झाले

छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर, भव्य महाराज स्व समाधान शिबिर अभियान टप्पा १ अंतर्गत राज्यात एक दिवसीय समाधान शिबीराचे महसूल मंडळ स्तरावर समाधान शिबीरांचे आयोजन करण्यात आले तालुक्या मधील किट्टी आडगाव, गोविंदवाडी, पातळवाडी, मंगरूळ, सावरगाव, राम पिंपळगाव, वाघोरा, माली पारगाव, शहाजानपूर, पुरुषोत्तम पुरी, सुलतानपूर, महातपुरी, जायकोचीवाडी, हिवराबुद्रुक, गव्हाण थडी, डुब्बाथडी, काळेगावथडी, रीझोरी, शेलगावथडी, काळेगावथडी इ. महसूल मंडळांनी सहभाग नोंदविला, या कार्यक्रमाचे उद्धाटक आमदार प्रकाश( दादा )सोळुंके, संतोष रुईकर तहसीलदार माजलगाव, गटविकास अधिकारी जोश्ना मुळीक, सरपंच रुक्मानंद खेत्रे, ग्रामपंचायत अधिकारी महेश गेंदले, मंडलाधिकारी संघर्ष ओवे किट्टी आडगाव,विलास मोरे पुरुषोत्तम पुरी, प्रवीण अंडगे हिवरा, मंगेश इंगळे रीझोरी, पूजा इंगळे मंगरूळ,इ. उपस्थित असून प्रलंबित प्रकरणाचे प्रमाणपत्र माननीय आमदार प्रकाश सोळुंके यांच्या हस्ते लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले असून हा कार्यक्रम सकाळी दहा ते पाच वाजेपर्यंत राबविण्यात आला, शासन आपल्या दारी आल्याने या कार्यक्रमास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक स्वामी विरभद्र यांनी केले .

# कपिलधार येथे शिवसंग्रामची जिल्हा कार्यकारणी बैठक संपन्न



बीड (प्रतिनिधी) शिवसंग्राम पक्षाची जिल्हा कार्यकारणी बैठक आज बीड तालुक्यातील कपिलधार येथे शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. आगामी ग्रामपंचायत तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका आणि संघटनात्मक बांधणी या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, मराठवाडा अध्यक्ष अनिल घुमरे, ज्येष्ठ नेते सुभाष जाधव, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे, शहराध्यक्ष सुहास पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी संघटनेची प्रगती ही कार्यकर्त्यांच्या सक्रियतेवर अवलंबून असल्याचे सांगितले. कार्यकर्त्यांनी गावोगाव तसेच वाडी-वस्त्यांपर्यंत संघटनेचे जाळे अधिक मजबूत करावे आणि स्वर्गीय मेटे साहेबांच्या विचारांचा वसा व वारसा समर्थपणे पुढे न्यायावा, असे त्यांनी आवाहन केले.तसेच आजही वाडी-तांड्यावर मेटे साहेबांचा विचार खोलवर रुजलेला असून आगामी काळात ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसंग्राम अधिक जोमाने काम करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या ताकदीशिवाय कोणीही निवडून येणार नाही, असा ठाम विश्वासही त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.बैठकीत संघटनात्मक मजबुती, आगामी निवडणुकांची रणनीती आणि कार्यकर्त्यांची भूमिका याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

## माजलगावात राजे मल्हारराव होळकर जयंती उत्साहात साजरी

माजलगाव (प्रतिनिधी) : राजे मल्हारराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त माजलगाव शहरात उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करून राजे मल्हारराव होळकरांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राजे मल्हारराव होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राजे मल्हारराव होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या शौर्यपूर्ण आणि जनकल्याणकारी कार्याची आठवण करून दिली.

या कार्यक्रमाला माजलगाव शहरातील उपनगराध्यक्ष सहाल भैय्या चाऊस, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके , माजी समाज कल्याण सभापती कल्याण आबुज ,नगरसेवक शरद यादव ,अर्जुन नाईकनवरे, आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे, मा. जि प सदस्य बबनराव सरवदे, मा.जि.प. सदस्य प्रकाश गवते, शिवसेना शहरप्रमुख पापा सोळंके, युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, युवा शेतकरी संघटनेचे अजय राउत, नारायण सातपुते, जगन्नाथ शिंदे ,अविनाश कांडुरे, सरपंच राज अर्जुन, सुभाष गडदे, संतोष देवकते ,रोहीत वगरे , ओबीसी महासंघाचे तालुकाध्यक्ष शामसुंदर पांचाळ, धोंडीराम जाधव, भगवानराव धरपडे, शंकर गावडे, राम आबुज, गोविंद गोचडे अशोक चोरमले, यांच्यासह राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी एकत्र येत राजे मल्हारराव होळकर यांना अभिवादन केले आणि त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचा संकल्प व्यक्त केला.या कार्यक्रमाचे आयोजन ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने , मल्हार सेनेचे कार्याध्यक्ष अशोक डोणे, व त्यांच्या कार्यकर्त्यांनी केले होते. शहरात जयंतीनिमित्त उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचा जिल्हास्तरीय मेळावा संपन्न



बीड दि १६(प्रतिनिधी) : शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या कृतिशील व्यक्तींना एकत्र आणून त्यांच्या दीर्घ सेवेतील अनुभवाचा लाभ सामान्य नागरिकांना मिळावा व त्यांच्या स्वतःच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी ते कार्यरत राहावे या उद्देशाने कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेची स्थापना करण्यात आली असून या संघटनेत जास्तीत जास्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष इंजि.मनोहर पोकळे यांनी केले आहे.

बीड येथील सामाजिक न्याय भवन येथे महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचा जिल्हास्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला होता त्याप्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते .याप्रसंगी जिल्हाध्यक्ष जालिंदर भोरे प्राचार्य सविता शेटे सेवानिवृत्त मुकाअ अशोकराव कोल्हे डॉ.वशिष्ठ जाधव,ठाणे जिल्हा अध्यक्ष लेखक दिग्दर्शक नाट्यकर्मी मोहन पवार,संजय केंद्रे, प्रसार प्रमुख तुकाराम पवार-ठाकूर ,कार्याध्यक्ष गौतम चोपडे ,कांचन गायकवाड प्रल्हाद जावळे ,शिवाजी बांगर, ,प्रवीण शेटे, रमेश ठाकूर इ मान्यवर उपस्थित होते. सेवानिवृत्तांचे पेन्शन विषयक प्रश्न सोडवणे, त्यांच्या सुरक्षिततेची व स्वास्थ्याची काळजी घेणे, ही कामे प्राधान्याने करण्यात येत असून त्यांच्या वैयक्तिक अडीअडचणीवरही मार्गदर्शन करून ज्येष्ठांची आरोग्य तपासणी ,व्याख्याने, परिसंवाद चर्चासत्रे, संमेलन, आयोजित करणे सभासदांचे हितसंबंध वृद्धिंगत व्हावे या अशा दृष्टीने सामाजिक बांधिलकी म्हणून संघटना सर्वांच्या पाठीशी उभी राहणार आहे.१ एक जानेवारी २०१६ पूर्वी निवृत्त व वयाचे ६४ वर्षे पूर्ण झालेल्या व त्यापेक्षा जास्त वर्ष पूर्ण झालेल्या सर्व पेन्शनधारकांना सुधारित बेसिक पेन्शन योजना मिळवून देणे ,वय ८० वर्षे व त्यावरील वयाच्या निवृत्तीवेतनधारकांना मिळणाऱ्या अतिरिक्त निवृत्तीवेतनाची जर केंद्राप्रमाणे व इतर राज्याप्रमाणे सुधारित करणे ,निवृत्तीवेतन अंश राशीकरण पुनर स्थापना ज्कालावधी एका वर्षा ऐवजी बारा वर्षे करणे ,आदी मागण्या संघटनेने शासनाकडे केलेले आहेत. .याप्रसंगी प्राचार्य सविता शेटे, ठाणे जिल्हाध्यक्ष मनोहर पवार ,अशोकराव कोल्हे आदींनी मार्गदर्शक भाषणे केली .महिला दिनाचे औचित्य साधून याप्रसंगी प्राचार्य सविता शेटे, जिल्हाळा केंद्राच्या केंद्र संचालिका छाया सर्वदे ,व सुनंदा कुलकर्णी यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी.जी.तांदळे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम चोपडे यांनी तर आभार प्रदर्शन कांचन गायकवाड यांनी मानले.

## महात्मा फुले समता परिषदेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निखिल शिंदे



बीड दि १६ (प्रतिनिधी )-अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद बीड जिल्हा कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या शिफारशीनुसार समता परिषदेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निखिल शिंदे, जिल्हा कार्याध्यक्षपदी अविनाश उगले तर शहराध्यक्षपदी नितीन राऊत यांची निवड समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष ना. छगनराव भुजबळ यांनी केली आहे.

समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली तर माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे समता परिषदेच्या राज्य कार्यकारिणीची बैठक रविवार दि. १५ मार्च २०२६ रोजी संपन्न झाली. यावेळी विविध जिल्ह्यातील कार्यकारणी बरोबरच बीड जिल्ह्याची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. यात ॲड. सुभाष राऊत यांचे खंदे समर्थक निखिल शिंदे यांची बीड जिल्हाध्यक्षपदी, अविनाश उगले यांची बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी तर नितीन राऊत यांची बीड शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. सदरील निवडीमुळे बीड जिल्ह्यातील समता परिषदेच्या पदाधिकारी आणि समता सैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून निखिल शिंदे, नितीन राऊत आणि अविनाश उगले यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यामध्ये स्वागत करण्यात आले आहे.

# ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार बाळासाहेब सोनसळे यांना जाहीर

माजलगाव(प्रतिनिधी): शिक्षण क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्य,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेली अविरत धडपड,शैक्षणिक उपक्रमातील नवीनता व समाजातील प्रभावी योगदान लक्षात घेऊन ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा माजलगाव येथे कार्यरत असणारे माध्यमिक शिक्षक तथा सुप्रसिद्ध व्याख्याते बाळासाहेब सोनसळे यांना जाहीर झाला आहे.

बाळासाहेब सोनसळे हे तंत्रस्नेही शिक्षक असून सी.सी.आर.टी नवी दिल्ली येथे त्यांनी प्रशिक्षण घेतले आहे. यशदा पुणे या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन या विषयाचे प्रशिक्षण देखील त्यांनी पूर्ण केले आहे.आय.सी.टीचे ते तालुक्याचे मास्टर ट्रेनर आहेत.त्याचबरोबर सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून देखील त्यांनी काम केलेले आहे. इ.टी.एफ प्रशिक्षण,स्मार्ट पीटी प्रशिक्षण,अविरत प्रशिक्षण यासारख्या अनेक प्रशिक्षणामध्ये त्यांनी सहभाग



घेतला आहे.ते शिक्षण शास्त्र विषयात सेट परीक्षा पात्र असून पीएचडी साठी मुलाखत दिलेली आहे.पीएम श्री योजनेअंतर्गत नुकताच त्यांनी बेंगलोर या ठिकाणी अभ्यास दौरा केलेला आहे.त्याचबरोबर सामाजिक उपक्रमांमध्ये देखील त्यांचा नेहमीच सहभाग असतो.रक्तदान,वृक्षारोपण, महापुरुषांच्या जयंतीच्या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतात.ते प्रसिद्ध व्याख्याते असून कुशल संघटक,विद्यार्थी प्रिय तंत्रस्नेही शिक्षक म्हणून परिचित आहेत.या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांना जिल्हा परिषद बीडचा जिल्हा शिक्षक पुरस्कार, तसेच राजमाता अहिल्यादेवी होळकर आदर्श शिक्षक पुरस्कार,मैत्रा फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय शिक्षण महर्षी पुरस्कार,राजे मल्हारराव होळकर सामाजिक प्रतिष्ठान आयोजित राज्यस्तरीय मल्हार रत्न पुरस्कार,यशवंती सेवाभावी संस्था पुणे यांच्या मार्फत दिल्या जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच वेगवेगळ्या सामाजिक संघटनेचे अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. ध्येय एज्युकेशन फाउंडेशन ही संस्था आज महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांसाठी एक मार्गदर्शक दीपस्तंभ ठरली आहे.संस्थेमार्फत अनेक उपक्रम यशस्वीरित्या पार पाडले गेले आहेत आणि आज लाखो विद्यार्थी आणि शेकडो शिक्षक ध्येय एज्युकेशन फाउंडेशनच्या या कार्याचा लाभ घेत आहे.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुदाम शेंडगे यांनी नुकतेच नामांकन पत्र देऊन बाळासाहेब सोनसळे यांची राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारसाठी निवड केली आहे.मान्यवरांच्या हस्ते ग.दि. माडगूळकर सभागृह, पुणे येथे लवकरच या पुरस्काराचे वितरण होणार आहे.या त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## विकास साळवे यांना रुग्णसेवक जिजाऊ माँ साहेब आदर्श पुरस्कार प्रदान



आष्टी दि १६(प्रतिनिधी) - मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद जिजाऊ माँ साहेब आदर्श पुरस्कार शिवश्री विकास उत्तम साळवे यांना रुग्णसेवा यांना जाहिर झाला असून बीड सांगवी येथील जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित महिला मेळाव्याचे निमित्ताने आ. सुरेश आण्णा धस यांचे सौ प्राजक्ता ताई सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते सत्कार व सन्मान केला आहे.गोर गरीबांचे सर्व सामान्य माणसाला आधार मदतीला धावून जाणारे आरोग्यदुत म्हणून ओळखले जाणारे नेतृत्व आदरणीय लोकनेते आ सुरेश आण्णा धस व प्रजाकाताई सुरेश धस यांच्या माध्यमातून मार्गदर्शकाखाली गोरं गरीबा रुणला आर्थिक सहकार्य मदत मिळुन लोकांना मदतीला वेळी वेळी सहकार्य केले जात आहे त्यामुळे यांना राज्यस्तरीय जिजाऊ माँ साहेब आदर्श पुरस्कार रुग्णसेवा प्रदान करुन सन्मानित केले आहे राजामता जिजाऊ माँ साहेबांच्या प्रेरणादायी विचारांचे आदर ठेवून समाज उन्नती, जनजागृती, व लोकहितासाठी उल्लेखनी कार्याची दखल घेऊन यांना पुरस्कार दिला आहे आपल्या पुढील कार्यासाठी आमदार श्री सुरेश आण्णा धस,मा प्राजक्ता ताई सुरेश आण्णा धस, मदनदा सांचालिका मुंबई ,मा शिवमती वर्षाताई माने, मा शिवमती तेजश्री मुळे, मा इजि तानाजी जजिरे आदि उपस्थित आपल्या पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

पार्श्वभूमी

दि.१७ मार्च २०२६ मंगळवार पान ६

## राजेंद्र मते यांना मातृशोक



बीड दि १६(प्रतिनिधी)- तालुक्यातील नाथापूर पासून जवळच असलेले लोणी शहाजानपूर येथील राजेंद्र मते सेवानिवृत्त जिल्हा परिषद बांधकाम विभाग लेखा अधिकारी यांच्या मातोश्री अहिल्याबाई कडाची मते वय वर्ष ९५ यांचा काल अंत्यविधी मूळ गावी सकाळी दहा वाजता झाला त्यांच्या पश्चा दोन मुले दोन मुले नात असा मोठा परिवार आहे. मते यांच्या कुटूंबियांवर कोसळलेल्या दुःखात पार्श्वभूमी परीवार सहभागी आहे.

## ॲड.विलास सोनवळकर यांचे निधन

अंबाजोगाई दि १६ (प्रतिनिधी) - येथील रहिवाशी आणि छत्रपती संभाजी



नगर येथील मुंबई उच्च न्यायालय संभाजीनगर खंडपीठातील ज्येष्ठ विधीज्ञ विलास राजाराम पंत सोनवळकर यांचे १४ मार्च शनिवार रोजी दुःखद निधन झाले. ते ६८ वर्षांचे होते .गेल्या दोन महिन्यापासून ते छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार चालू होते . शनिवारी पहाटे त्यांचे पान २ वर

# पोलीस पाटील भरतीत निकालानंतर दुसऱ्याच दिवशी फुटले वादाला तोंड

### ४०हून अधिक आक्षेप अर्ज

### स्थानिक रहिवासी नसल्याचा प्रतिस्पर्धी उमेदवारांचा आक्षेप

### सात उमेदवारांची १८ मार्चला पुन्हा पडताळणी

**पाटोदा दि.१६(प्रतिनिधी):- पाटोदा व आष्टी तालुक्यातील पोलीस पाटील भरती प्रक्रियेचा निकाल जाहीर होताच नव्या वादाला तोंड फुटले आहे. रविवारी (१५ मार्च) सायंकाळी २४६ जागांसाठी निकाल जाहीर झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच प्रशासनाकडे सोमवारी (१६ मार्च) दुपारपर्यंत तब्बल ४०हून अधिक आक्षेप अर्ज दाखल झाले. पात्र ठरलेल्या काही उमेदवारांवर स्थानिक रहिवासी नसल्याचा आरोप सहउमेदवारांकडून करण्यात आल्याने प्रक्रियेवर संभ्रम निर्माण झाले आहे.**

पाटोदा व आष्टी या दोन तालुक्यांसाठी एकत्रितपणे पोलीस पाटील भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. या भरतीसाठी मोठ्या प्रमाणात उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ८४७ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले होते. मात्र त्यातील तब्बल १०५ उमेदवार मुलाखतीसाठी हजरच राहिले नसल्याची माहिती प्रशासनाने दिली. ०१ ते ०८ मार्चदरम्यान पाटोदा येथे आठ दिवस मुलाखती पार पडल्या. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, समाजकल्याण विभागाचे प्रतिनिधी, पोलीस प्रतिनिधी आणि इतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली.

### आक्षेप अर्जांची सखोल चौकशी होणार

**या संदर्भात उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांनी सांगितले की, समान गुण मिळालेल्या उमेदवारांना १८ मार्च रोजी पडताळणीसाठी बोलावण्यात आले आहे. तसेच प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जांच्या अनुषंगाने संबंधित तहसीलदार व गटविकास अधिकारी कार्यालयामार्फत कागदपत्रांची सखोल तपासणी करून पुढील निर्णय घेतला जाईल.**

### *अर्जाच्या वेळी पडताळणी का झाली नाही?*

**भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने झाल्याचा प्रशासनाचा दावा असतानाही उमेदवारांच्या स्थानिक रहिवासाबाबतची पडताळणी अर्ज स्वीकृतीच्या टप्प्यावरच का करण्यात आली नाही, असा सवालही उपस्थित होत आहे. विशेषतः आष्टी तालुक्यातील गावांची संख्या अधिक असल्याने तेथून आक्षेप अर्जांची संख्या तुलनेने जास्त असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या भरती प्रक्रियेतील पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

मुलाखतीसाठी शैक्षणिक पात्रता, वारसदार, होमगार्ड-एनसीसी, अनुभव आणि मुलाखत अशा निकषांवर एकूण २० गुणांचे गुणांकन निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी मुलाखतीसाठी केवळ तीन गुण निश्चित करण्यात आले होते. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रविवारी सायंकाळी २४६ जागांसाठी अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. अनेक गावांमध्ये निवड झालेल्या उमेदवारांचा

## तुलसी समूहाकडून १५ विद्यार्थिनींना सायकल वाटप

बीड (प्रतिनिधी) - तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीचे औचित्य साधून सुरू करण्यात आलेल्या 'सायकल बँक' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा दुसरा टप्पा शनिवारी (दि. १४) तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन येथे उत्साहात पार पडला. या अभियानांतर्गत दुसऱ्या टप्प्यात आणखी १५ गरजू विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले.

## वीज पुरवठा बंद तरीही बील ; महावितरणने चालवला वीज ग्राहकाचा मानसिक छळ

अंबाजोगाई दि.१६(प्रतिनिधी)- महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे शहरातील गुरूवार पेठ भागातील एका ग्राहकाला गेल्या अनेक महिन्यांपासून वीज बिल न मिळता, थेट थकबाकी दाखवत असल्याने प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेकदा लेखी स्वरूपात विनंती अर्ज आणि अधिकृत बिल देण्याची मागणी करूनही बिल न दिल्याने या ग्राहकाने संताप व्यक्त केला असून, यामुळे महावितरण कंपनीच्या ढिसाळ कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यासंदर्भात आमच्या प्रतिनिधीशी बोलताना समाजवादी पार्टीचे शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सांगितले की, मीटर रिडींग वेळेवर न घेणे किंवा रिडींग घेऊनही बिल न पाठवल्यामुळे अनेकांना बिल भरता येत नाही. यामुळे अचानक एकाच वेळी मोठ्या रकमेचे सरासरी बिल येते, अशाने सामान्य माणसाचे किती हाल करतेत तसेच गोरगरिबांना हराशमेंट करून लाईट बिल वसुलीचे कारण दाखवून त्या लोकांकडून पैसे वसूल करतात. ज्यामध्ये दंडाची रक्कमही असते. या प्रकारामुळे ग्राहकांना विनाकारण आर्थिक भुर्दंड आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. असाच काहीसा अनुभव मला ही आला आहे. मला वीज वापराचे अधिकृत बिल देण्यात यावे अशी मागणी मी ८ ऑगस्ट २०२४ पासून आजतागायत पर्यंत करीत आहे. याबाबत मी दिनांक ८ ऑगस्ट २०२४, २१ नोव्हेंबर २०२४, १७एप्रिल २०२५ आणि २३ जुन २०२५ या विविध तारखांना अर्ज देवून महावितरणच्या अभियंता यांना विनंती केली आहे. तरी परंतु, महावितरणने या प्रकरणी कोणतीही दखल घेतलेली नाही. सदर अर्जांवर काही कार्यवाही सुध्दा केली नाही. उलट दुर्लक्ष केले आहे असे परदेशी यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, महावितरणच्या दप्तर दिरंगाईचा फटका आमच्या सारख्या नियमित वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांना बसत आहे. वारंवार मागणी करूनही अधिकृत वीज बिल मिळत नसल्याने, दिवसेंदिवस न वापरलेल्या वीज बिलाची थकबाकी वाढत आहे. मी या संदर्भात सातत्याने मागणी करूनही महावितरण अधिकृत बिल देत नाही, त्यामुळे वेळोवेळी मी बिलाची प्रिंट पान २ वर

### सरकारी पगार वेळेवर पण काम मात्र मनावर

## नगर पालिकेतील अधिकारी घरूनच चालवितात कारभार

**बीड दि १६ (प्रतिनिधी)- बीड नगरपरिषदेमधील प्रशासनाचा कारभार सध्या पूर्णपणे विस्कळीत झाल्याचे चित्र समोर येत असून काही अधिकारी-कर्मचारी कार्यालयात नियमित उपस्थित राहण्याऐवजी स्वतःच्या घरूनच नगरपरिषदेचा कारभार चालवत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशानुसार सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ठरलेल्या वेळेत उपस्थित राहून नियमित कामकाज करणे बंधनकारक असताना बीड नगरपरिषदेत मात्र याच्या पूर्णपणे विरोधी परिस्थिती दिसून येत आहे. प्रत्यक्षात नगरपरिषद कार्यालय सकाळी उशिरा सुरू होत असून अनेक कर्मचारी दुपारी लवकरच कार्यालयातून निघून जात असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास येत आहे.या मनमानी कारभारामुळे विविध कामांसाठी येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असून अनेकांची कामे दिवसन्दिवस प्रलंबित राहत आहेत. काही कर्मचारी वारंवार कार्यालयाबाहेर जात असल्यामुळे नागरिकांना संबंधित अधिकाऱ्यांची वाट पाहत बसावे लागत असल्याची तक्रार नागरिकांनी व्यक्त केली आहे. शासनाच्या नियमांनुसार कार्यालयात बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली व हालचाल नोंदवही असणे आवश्यक असताना बीड नगरपरिषदेमध्ये या बाबीकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी कर्मचारी मनमानी वेळेत येणे-जाणे करत असल्याने कार्यालयीन शिस्त पूर्णपणे ढासळल्याचे चित्र आहे.

विशेष म्हणजे बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे स्वतः वेळेचे पान २ वर

## अमरजीत राम बाहेती यांना संगीत विषयातील पीएचडी प्रदान

गेवराई दि.१६ (प्रतिनिधी) :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,



छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून अमरजीत राम बाहेती यांना मराठवाड्यातील स्वातंत्र्योत्तर लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीतातील स्त्रियांचे स्थान व योगदान: चिकित्सक अभ्यास या विषयातील संशोधनासाठी संगीत विषयातील पीएचडी हि पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या पान २ वर

## रानडुकरांचा कळप शेतात घुसला की पीक संपतेच ; शेतकऱ्यांची संरक्षणाची मागणी

बीड दि.१६(प्रतिनिधी):- शिरूर तालुक्यात सध्या जंगली रानडुक्करांचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढला असून शेतकर्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत आहे. रानडुक्करांचा कळप एखाद्या शेतात घुसला की एकाच रात्रीत किमान एक एकर पीक उध्वस्त करून टाकतो, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून शासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी विविध उपाय करत असले तरी त्याचा फारसा उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे. काही शेतकरी शेताभोवती तार लावून त्यात करंट सोडण्याचा प्रयत्न करतात, मात्र त्यामुळे अपघात होण्याचा धोका निर्माण होतो. जाळी लावली तरी रानडुक्कर ती तोडून आत शिरतात. परिणामी शेतकर्यांच्या मेहनतीने उभे केलेले पीक एका रात्रीत नष्ट होत आहे.एकीकडे निसर्गाच्या लहरीपणाचा फटका तर दुसरीकडे जंगली प्राण्यांचा वाढता त्रास अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. काही शेतकरी स्वतः रात्री शेतात राहून पिकांची राखण करतात, मात्र त्यावेळी जंगली प्राण्यांकडून हल्ला होण्याची भीतीही सतावत आहे.

## ट्रॅक्टरची चावी का देत नाहीस ?असे म्हणुन पोटच्या मुलाने पित्याला केले रक्तबंबाळ

### बहिण व मेहुण्यालाही लोखंडी पाईपने केली मारहाण

केज दि.१६(प्रतिनिधी)- जमीन आणि ट्रॅक्टर नावावर करण्यासाठी मुलाने जन्मदात्या पित्यासह बहीण आणि मेहुण्यालाही बेदम मारहाण केल्याची घटना तालुक्यातील नाहोली येथे शनिवारी रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान घडली आहे.बहीणसह मेहुण्याच्याही अंगावर चटणी टाकून लोखंडी पाईप आणि बेल्टने त्यांना अमानुष मारहाण केल्या प्रकरणी केज पोलीसात १० जणाविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे. वडिलांपासून विभक्त राहणाऱ्या लक्ष्मण ठोंबरे या ट्रॅक्टर चालक मुलाने ट्रॅक्टरची चावी कां देत नाहीस आसे म्हणुन जमीन माझ्या नावावर करून दे म्हणत सासरच्या लोकांना सोबत घेवून जन्मदात्या पित्याला मारहाण केल्याची घटना नाव्हेली येथे शनिवारी रात्री आठ वाजता घडली आहे. या प्रकरणी सुभाष पाटिलबुवा ठोंबरे यांच्या फिर्यादी वरून रविवारी ( दि. १५ ) रात्री ११ वाजता लक्ष्मण सुभाष ठोंबरे ( मुलगा ), सारिका लक्ष्मण ठोंबरे ( सून ), आण्णा नारायण बिक्कड (इवाई ), आशा आण्णा बिक्कड (इन ), नाना चिंतामण बिक्कड, ( चुलत इवाई ),नाना शिवाजी बिक्कड, गणेश नाना बिक्कड, नरसिंग आण्णा बिक्कड, टिंकल पान २ वर



### अर्धामसला येथे शिक्षकाने गळफास घेऊन केली आत्महत्या

## आत्महत्यास प्रवृत्त करणाऱ्यावर गुन्हा दाखल करून अटक करा ; कुटुंबाची मागणी

सिरसदेवी, दि १६ (प्रतिनिधी)- - गेवराई तालुक्यातील अर्धा मसला या गावातील एका शिक्षकाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना शनिवार दि.१४ मार्च २०२६ रोजी सकाळी घडली आहे.



सविस्तर माहिती अशी कि, तालुक्यातील अर्धा मासला येथील शिक्षक नाव. कैलास उघडे वय अंदाजे ५० वर्ष यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे या घटनेची माहिती शेजारी राहत असलेले नातेवाईक यांना मिळताच उघडे सर यांच्या घराकडे धाव घेतली घरी गेल्यानंतर दरवाजा उघडल्यानंतर दरवाजा समोरच पाहिले असता कैलास उघडे यांनी घरामध्ये गळफास घेतल्याचे निदर्शनात आले. आत्महत्या करण्यापूर्वी एक सुसाईड नोट लिहून ठेवलेली असल्याचे निदर्शनास आले आहे.या सुसाईड नोटमध्ये पाच ते सहा दिवसांमध्ये त्यांच्यासोबत काय घडले आहे काय नाही या संदर्भात त्यांनी लिहिले आहे. तसेच उघडे सर हे सिरसदेवी येथील माध्यमिक विद्यालय या शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते याच दरम्यान त्यांच्यासोबत काही शिक्षकांनी त्यांना त्रास दिल्याचे सुसाईड नोटमध्ये लिहिले आहे.तसेच आजारी असल्याचेही त्यांनी म्हटलं आहे, मेडिकल रजा याचाही उल्लेख केला आहे, पगार संदर्भात ही लिहिलं आहे तसेच शिक्षकांची नावही लिहिले आहेत या सुसाईड नोट मुळे उघडे सर यांच्या कुटुंबाने आरोप करत म्हटले आहे पान २ वर

### अभिमानाचा आणि भावनिक क्षण

## डॉ.प्रविण ढगे यांना आंतरराष्ट्रीय फेलोशिप सन्मान

बीड दि.१६(प्रतिनिधी): जिल्ह्यातील सुप्रसिद्ध दंत चिकित्सक डॉ. प्रविण ढगे यांना ग्लोबल कॉलेज ऑफ ओरल ईम्प्लायलॉजिस्ट (Global College of Oral Implanto -logists) या आंतरराष्ट्रीय संस्थेची प्रतिष्ठित फेलोशिप पदवी बहाल करण्यात आली आहे. कष्ट, जिद्द आणि रुग्णसेवेच्या निष्ठेने केलेल्या प्रवासाला जागतिक पातळीवर मान्यता मिळाली आहे. पान २ वर



## टायर फुटल्याने धावती ट्रॅव्हल्स पलटून २० प्रवासी जखमी बसने पेट घेतला, आतील सर्व साहित्य व बॅगा जळून खाक

### केज तालुक्यातील सारणी शिवारात घडलेली घटना

केज दि.१६(प्रतिनिधी)- तालुक्यातील अहमदनगर - अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील सारणी शिवारात जळगाव येथून लातुर कडे येणाऱ्या विश्वा ट्रॅव्हल्सचे समोरचे टायर फुटून झालेल्या अपघातात २० प्रवाशी जखमी झाले आसून, ट्रॅव्हस पलटी होताच तीने पेट घेतल्यामुळे आतील बॅगा,सामान जळून खाक झाले आसले तरी या अपघातात जीवित हानी झाली नाही.जखमीना लातुर आणि अंबाजोगाई येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले..

प्राप्त माहितीनुसार जळगाव येथून रविवारी आठ वाजता निघालेली लातुर येथील विश्वा ट्रॅव्हल्स ची बस २८ प्रवाशांना घेवून लातुर कडे जात आसताना सोमवारी (दि १६ )पहाटे अडीच वाजण्याच्या दरम्याण ही बस केज तालुक्यातील सारणी ( सांगवी ) शिवारातील धोकेदायक वळणाजवळ आली आसता धावत्या ट्रॅव्हलसचे समोरील उजव्या बाजूचे टायर फुटल्यामुळं भरधावं वेगातील ही बस वळणावरील लोखंडी कठडे तोडून खोल खड्ड्यात प्रवाशी ये, जा





करणाऱ्या दरवाजाच्या बाजुनेच पलटी झाली. दरम्यान कांही वेळात या मार्गांवरून नांदेड पुणे जाणाऱ्या बस चालकाने प्रसंगावधान राखून ट्रॅव्हल्स बसच्या खिडक्याच्या काचा फोडून आतील प्रवाशांना सुखरूप बाहेर काढल्या नंतर ट्रॅव्हल्सने पेट घेतला. या आगीत ट्रॅव्हस सहित आतील प्रवाशांचे सामान, बॅगा जळून खाक झाल्या.इतर प्रवाशांना या मार्गांवरून पान २ वर

## माजी आ.आजबे यांच्या वतीने आष्टीत इफ्तार



आष्टी दि १६ (प्रतिनिधी):- दरवर्षीप्रमाणे यावर्षीही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते माजी आ.बाळासाहेब आजबे यांच्या वतीने पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून आष्टी येथे मुस्लिम बांधवांसाठी सोमवार दि.१६ मार्च रोजी सायंकाळी ६:४४ वाजता इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. माजी आ. बाळासाहेब आजबे यांच्या वतीने आयोजित इतर पार्टीच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, पान २ वर